रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग | आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | वर्ष ८८ | अंक ३८ | पृष्ठे ८ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
www.krushival.in

# कृषीवल

रायगड, रविवार, दि. १४ जुलै २०२४

किंमत ४ ₹

**12 ACRES OF N.A. LAND FOR SALE IN NERAL, TALUKA KARJAT**
Flat Land, located in a Residential Zone, just 7 kms from Neral Station. Ideal for plotting Scheme Development, Bungalow Scheme, Resort, or Housing Project.
**PANVEL LAND FOR SALE**
10 acres of land, located 4 kms from Shedung Toll Plaza, with 800 meters of Frontage on the Mumbai-Pune Highway. Just 10 kms from Phalaspe Phata. In Commercial Zone Under MSRDC DP.
For pricing & details call 9867008432








● नेहुलीच्या सिद्धेश्वर नदीचे रौद्ररूप. (छायाचित्र : समीर मालोरे)

# पावसाचं 'सर्जिकल' स्ट्राईक

## जिल्हा सरकारी रुग्णालयात पाणी शिरले

। रायगड । खास प्रतिनिधी ।
जिल्ह्याच्या किनारपट्टी भागाला पावसाने चांगलेच झोडपून काढले आहे. जोरदार बरसलेल्या पावसामुळे सर्वत्र पाणीच पाणी झाले होते. पावसाचा जोर इतका प्रचंड होता की, त्यामुळे अलिबाग येथील जिल्हा सरकारी रुग्णालयाच्या दुसऱ्या मजल्यावरील सर्जिकल वॉर्डमध्ये पाणीच पाणी झाले होते. त्यामुळे रुग्णांसह त्यांचे नातेवाईक आणि आरोग्य कर्मचाऱ्यांची चांगलीत तारांबळ उडाली होती. जिल्ह्याच्या विविध ठिकाणी पावसाचा जोर कायम असल्याने सकल भागांमध्ये पाणी साचले.

अलिबाग येथील जिल्हा सरकारी रुग्णालयाच्या इमारतीच्या डागडुजीचे काम सुरु आहे. दुरुस्तीवर आतापर्यंत कोट्यवधी रुपये खर्च झाले आहेत. असे असताना शनिवारी सकाळी सर्जिकल वॉर्डमध्ये पाणी आले. त्यामुळे रुग्णांसह त्यांच्या नातेवाईकांची गैरसोय झाली. या वॉर्डमध्ये घुसलेल्या पाण्याचा फटका डॉक्टर, नर्स, वॉड बॉय यांच्यासह अन्य आरोग्य कर्मचाऱ्यांना बसला.

सदर इमारतीचे काम सुरु असल्याने टेरेसवरुन पाणी वाहून नेणाऱ्या पाईपमध्ये कचरा अडकल्याने ते पाणी सर्जिकल वॉर्डमध्ये घुसले होते. सदर पाईपची दुरुस्ती करण्यात आली आहे, असे जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. आंबादास देवमाने यांनी कृषीवलशी बोलताना सांगितले.

पान २ वर

## रुग्णांसह नातेवाईकांची उडाली तारांबळ



> जोरदार पडणाऱ्या पावसामुळे मुंबई–गोवा महामार्ग पाण्याखाली गेला आहे. तसेच किल्ले रायगडावर जाणाऱ्या मार्गावर दरडी पडल्या आहेत. त्यामुळे सध्या पायरी मार्ग बंद केला आहे, पाऊस कमी झाल्यानंतर तेथील दरडी हटवण्याचे काम हाती घेण्यात येणार आहे.
> – ज्ञानोबा बानापूर, प्रांताधिकारी, महाड

> पावसाचा जोर वाढल्यामुळे रुग्णालयातील सर्जिकल वॉर्डमध्ये शनिवारी पाणी आले. याचा रुग्णांना कोणताही त्रास झाला नाही. त्यांची गैरसोय होऊ नये यासाठी त्यांना तात्काळ दुसऱ्या वॉर्डमध्ये हलविण्यात आले आहे.
> – अंबादास देवमाने, जिल्हा शल्यचिकित्सक

## आमदार चिखलात



अनेकांवर पावसाचं संकट असताना, लोकांचे संसार उद्ध्वस्त होत असताना आ. महेंद्र दळवी बगलबच्चांसह चिखलात लोळत मजामस्तीकरीत असल्याचा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत. हे सर्वसामान्यांच्या जखमेवर मीठ

पान २ वर

# भराव नडला, तालुका पाण्यात बुडाला



। अलिबाग । विशेष प्रतिनिधी । मुसळधार पावसामुळे संपूर्ण अलिबाग तालुक्यात पूरपरिस्थिती उद्भवली आहे. त्यामुळे हजारो रहिवाशांचे प्रचंड नुकसान झाले. सलग दोन दिवस पडणाऱ्या मुसळधार पावसाने तालुक्याची दैना उडवली. यापूर्वी तालुक्यात अनेकवेळा पाणी तुंबले, मात्र त्याचा निचरा त्याच तत्परतेने व्हायचा. पण, यावेळी धनदांडग्यांसोबत आर्थिक हित जोपासणाऱ्या स्थानिक लोकप्रतिनिधींच्या आशीर्वादाने आणि प्रशासनाच्या मदतीने सुरु असलेले अनधिकृत बांधकाम, कांदळवनांची कत्तल, बेसुमार भराव आदी कारणांमुळे भयानक स्थितीला तोंड द्यावे लागल्याने नागरिकांनी नाराजी व्यक्त केली.

अनेक ठिकाणी नाल्यावरील अतिक्रमण, नाल्याचा प्रवाह बदलणे, खाडी किनारी खारफुटीची कत्तल करून अनधिकृत बांधकाम, पाण्याचा निचरा करण्याच्या नियोजनाचा अभाव, रस्त्यावर टाकण्यात आलेला डेब्रिजचा भराव या सगळ्यावर प्रशासनाचा कानाडोळा आदी कारणं याला जबाबदार ठरत आहेत. त्यामुळे आता तरी सरकारने महागड्या स्वप्नांसाठी नागरिकांना वेठीस धरु नये, अशी आर्त हाक नुकसानग्रस्तांनी मारली आहे.

प्रशासनाने पावसाळ्यापूर्वी याबाबत कोणतेही नियोजन न केल्याचा फटका आज नागरिकांना सहन करावा लागत आहे. अनेक ठिकाणी पाणी तुंबण्याच्या घटना घडल्या आहेत. परिसरात अतिवृष्टीने लोकांची घरे पाण्याखाली गेली आहेत.

पान २ वर

> जिल्ह्यात पाऊस मोठ्या प्रमाणात पडला. पावसामुळे अनेक भागात पाणी साचले. पाणी जाण्याच्या मार्गाला भरावाचा अडथळा निर्माण होत असल्यास संबंधित विभागामार्फत कारवाई करण्याच्या सूचना केल्या जातील. या आठवड्यात अलिबाग, रेवदंडा, रोहा मार्गावरील पाणी तुंबणाऱ्या ठिकाणांची पाहणी करुन कार्यवाही केली जाईल.
> – संदेश शिर्के, निवासी उपजिल्हाधिकारी, रायगड

### नेमका विकास कोणाचा?

स्थानिक आमदार साहेबांनी कोट्यवधी रुपयांची कामे केल्याची बॅनरबाजी अनेकदा केली. पण, नेमकी कुठे केली? हे त्यांना आणि त्यांच्या बगलबच्चांनाच ठाऊक, अशी संतप्त टीका नागरिकांना केली आहे. आपत्कालीन काळात नेहमीच गायब असणारे, मात्र निवडणुकीपूर्वी दर्शन देणारे आमदार नुकसानग्रस्तांना काय आधार देणार, असा सवालही नागरिकांनी उपस्थित केला आहे. केवळ स्वतःच्या स्वार्थापोटी काम करणाऱ्या आमदारांनी नेमका कुणाचा विकास केला, असे अनेक प्रश्न नागरिकांनी संतापाच्या भरात उपस्थित केले आहेत.

### जिल्हाधिकारी, तहसीलदारांचे दुर्लक्ष

समुद्रकिनाऱ्यापर्यंत अनधिकृत बांधकामे उभी राहिली आहेत. सीआरझेड आणि पूरनियंत्रण रेषेच्या नियमांचे उल्लंघन करून ही बांधकामे उभी राहात आहेत. पूरनियंत्रण रेषेच्या आत भराव टाकल्याने नैसर्गिक नाले अरूंद झाले आहेत. याआधी कधीही पूर येत नव्हता. एका पावसाळ्यात चार ते पाच वेळा पूरस्थितीचा सामना करावा लागतो. पुराचा सर्वाधिक फटका स्थानिक नागरिक आणि शेतीला बसत असून, जिल्हाधिकारी व तहसीलदार याकडे दुर्लक्ष करीत असल्याचा आरोप नुकसानग्रस्त नागरिकांकडून करण्यात आला आहे.




# 'कॅग'चे राज्य सरकारवर ताशेरे

## राज्यावर कर्जाचा बोजा ८ लाख कोटींवर!

। मुंबई । प्रतिनिधी ।
राज्यातील महायुती सरकारने अर्थसंकल्पात मोठमोठ्या घोषणा करत जनतेला खुश करण्याचा प्रयत्न केला. मात्र, महसुली जमा आणि खर्च यांच्यातील वाढत चाललेल्या तफावतीमुळे भारताचे नियंत्रक आणि महालेखा परीक्षकांनी (कॅग) राज्य सरकारवर ताशेरे ओढले आहेत. राज्यावरील कर्जाचा बोजा ८ लाख कोटींवर गेला आहे. त्यामुळे राज्य सरकारने विविध विभागांच्या गरजा आणि वाटप केलेल्या संसाधनांचा वापर करण्याची त्यांची क्षमता लक्षात घेऊन वास्तववादी अर्थसंकल्प तयार केला पाहिजे, असा सल्लाही कॅगने महाराष्ट्र सरकारला दिला आहे.

पुरवणी मागण्या, विनियोग तसेच

पान २ वर

## सात राज्यांतील पोटनिवडणूक
# इंडिया आघाडीचा डंका

## ■ १३ पैकी १० जागांवर बाजी

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।
सात राज्यांतील विधानसभेच्या १३ जागांसाठी झालेल्या पोटनिवडणुकीत इंडिया आघाडीने १० जागा जिंकत बाजी मारली आहे. तर, भाजपला दोन जागा मिळाल्या असून, एका जागेवर अपक्ष उमेदवार निवडून आला आहे.

पश्चिम बंगालमधील चारही जाग तृणमूलने जिंकल्या आहेत, तर

### ■ भाजपला मोठा फटका

हिमाचल प्रदेशातील ३ पैकी २ जागा काँग्रेसने जिंकल्या. बिहारमधील रुपौली, हिमाचल प्रदेशमधील देहरा, हमीरपूर, नालागढ, मध्य प्रदेशातील अमरवाडा, पंजाबमधील जालधंर पश्चिम, तामिळनाडूतील विक्रवंडी, उत्तराखंडमधील

पान २ वर



# भरपावसात विद्यार्थ्यांची पायपीट

**●एसटी बस वेळेवर नसल्याने शैक्षणिक नुकसान ● कर्जत आगाराने लक्ष घालण्याची मागणी**

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

**कर्जत तालुक्यातील कळंब परिसरातील विद्यार्थ्यांना शाळेत जाण्यासाठी वेळेवर एसटी गाड्या नाहीत. त्यामुळे विद्यार्थ्यांना अधिक पैसे मोजून खासगी वाहनातून किंवा रस्त्याच्या बाजूने चालत जावे लागत आहे. विद्यार्थ्यांची पायपीट दूर करण्यासाठी कर्जत राज्य परिवहन आगाराने एसटी गाड्या सुरू कराव्यात, अशी मागणी केली आहे.**



> एसटी बस सुरु झाली तर आम्हा नागरिकांना याचा खूप फायदा होईल. नेरळला जाण्यासाठी आम्हाला जास्तीचे पैसे लागणार नाहीत, तसेच आमचा वेळदेखील वाचू शकेल.
> – चंद्रकांत पोसाटे, पालक

> एसटी बस नसल्याने आम्हाला रोज शाळेत जायला उशीर होतो. परंतु, एसटी बस सुरु झाली तर आम्ही शाळेत वेळेवर पोहोचू शकतो.
> – हर्षल पाटील, विद्यार्थी

कर्जत तालुक्यातील ओलमन ग्रामपंचायत हद्दीतील बोरगाव गावातील विद्यार्थ्यांना शिक्षण घेण्यासाठी संघर्ष करावा लागतो. उच्च शिक्षणासाठी बाहेर गावी जाण्यासाठी एसटी बस सुविधा नसल्याने पाच किलोमीटरची पायपीट करावी लागते. लवकरात लवकर एसटी बस सेवा सुरु करावी, अशी विद्यार्थी मागणी करत आहेत.

अन्न, वस्त्र, निवाऱ्यासोबतच शिक्षण व आरोग्य यादेखील माणसाच्या मूलभूत गरजा बनल्या आहेत. मात्र, हेच शिक्षण घेण्यासाठी बोरगाव गावातील विद्यार्थ्यांना संघर्ष करावा लागतो. गावातील विद्यार्थ्यांना प्राथमिक शिक्षण घेतल्यानंतर पुढील शिक्षणासाठी गावाबाहेर कळंब, नेरळ आणि कर्जत या ठिकाणी जावे लागते. दररोज सुमारे ४० विद्यार्थी शिक्षणासाठी गावाबाहेर जात असतात. खासगी वाहनाने प्रवास करणे खिशाला परडवत नसल्याने हे विद्यार्थी पाच किलोमीटरचा पायी प्रवास करत कळंबपर्यंत पोहोचतात, त्यानंतर पुढील प्रवास महामंडळाच्या एसटी बसने करतात. बोरगाव, उंबरखांड, बोंडेशेत तसेच पेंढरी येथील विद्यार्थीदेखील कळंब, पोशीर पुढे नेरळ येथील माध्यमिक विद्यालयात शिक्षण घेत आहेत. मात्र, बोरगाववरून नेरळला जाण्यासाठी वाहनाची सुविधा नसल्याने या विद्यार्थ्यांना पायी प्रवास करावा लागतो. खांद्यावर दप्तराचे भले मोठे ओझे घेऊन हे विद्यार्थी दररोज सुमारे एक तास चालत पाच किलोमीटरचा पायी प्रवास करत असतात. परिणामी, या विद्यार्थ्यांना शाळेत पोहोचायला नेहमीच उशीर होतो. यामुळे त्यांचे शैक्षणिक नुकसान होते. तसेच खासगी वाहनाने जाणे खिशाला परवडत नसल्याने विद्यार्थी पायी जाण्याचा मार्ग अवलंबतात. परिणामी, विद्यार्थ्यांची खूप मोठी गैरसोय होते. विद्यार्थ्यांना भर पावसात पायी प्रवास करावा लागतो. दरम्यान, विद्यार्थ्यांचा हा त्रास कमी व्हावा यासाठी शाळेच्या वेळेवर नेरळ-बोरगाव एसटी सेवा सुरु करावी, अशी मागणी विद्यार्थ्यांकडून होत आहे.

# पशुसंवर्धन कर्मचारी साखळी उपोषणाच्या पावित्र्यात

**जिल्हा कार्यालयाच्या कारभाराविरोधात लढा**

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

ग्रामीण भागात काम करणाऱ्या पशुसंवर्धन विभागातील कर्मचाऱ्यांची जिल्हा परिषद पशुसंवर्धन जिल्हा कार्यालयाकडून कामे वेळेत होत नाही. त्यांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष केले जात असल्याचा आरोप पशुचिकित्सा व्यवसाय संघटना महाराष्ट्र शाखा रायगडमार्फत करण्यात आला आहे. त्यामुळे कर्मचारी आक्रमकतेच्या भूमिकेत असून, अधिकाऱ्यांचे लक्ष वेधण्यासाठी येत्या १५ जुलैला साखळी उपोषणाचा इशारा त्यांनी दिला आहे.

पशुचिकित्सा व्यवसाय संघटनेच्या अनुषंगाने सहाय्यक पशुधन विकास अधिकारी व पशुधन पर्यवेक्षक यांचे दहा, वीस, तीसचे आश्वासित पदोन्नती तसेच पशुधन पर्यवेक्षक पदावरून सहाय्यक पशुधन विकास अधिकारी पदोन्नती याबाबत जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी जिल्हा परिषद रायगड यांचे मागील एक वर्षापासून समक्ष भेटून बोलून अद्याप कार्यवाही करण्यात आली नाही. मुख्य कार्यकारी अधिकारी व अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडेदेखील या समस्येचे गाऱ्हाणे मांडण्यात आल आहेत. अनेक वेळा चर्चा करून, पत्र देऊनदेखील अद्यापपर्यंत कोणतीही कार्यवाही झाली नसल्याचा आरोप पशुचिकित्सा व्यवसाय संघटना महाराष्ट्र शाखा रायगडच्या वतीने करण्यात आला आहे. तसेच जिल्हा कार्यालयातील कर्मचारी कोणतीही कार्यवाही करत नाहीत. सहाय्यक पशुधन विकास अधिकारी सुहास कांबळे हे मयत झालेले असून, त्यांच्या भविष्य निर्वाह निधीचा प्रस्ताव अद्याप मंजूर झालेला नाही. त्याचा फटका कुटुंबियांना बसत आहे. या जिल्हा कार्यालयातील कारभाराबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. २० जून २०२४ च्या शासन निर्णयानुसार पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी २ यांना प्रथमोपचार, खच्चीकरण, लसीकरण, कृत्रिम रेतन ही कामे सहाय्यक पशुधन विकास अधिकारी व पशुधन पर्यवेक्षक करण्यासाठी दिले आहेत. त्याबाबत जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी व जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त यांच्याकडे मार्गदर्शन मागितले होते. त्याबाबत अद्यापपर्यंत मार्गदर्शन मिळाले नसल्याचे सांगण्यात आले आहे.

जिल्हा परिषद कार्यालयाकडून वारंवार अधिनस्त कर्मचाऱ्यांची कामे वेळेत होऊ शकली नाहीत. जिल्हा परिषद विभागाकडून कर्मचाऱ्यांच्या कामांबाबत वारंवार टाळाटाळ केली जित आहे. त्याविरोधात पशुसंवर्धन विभागातील कर्मचारी लढा पुकारणार आहेत.

# विद्यार्थिनींना भातलावणीचे धडे

**शरदचंद्रजी पवार कृषी विद्यालयाचा उपक्रम**



**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यपीठांतर्गत शरदचंद्रजी पवार कृषी विद्यालयाच्या विद्यार्थिनींना भातलावणीचे प्रात्यक्षिकातून धडे देण्यात आले. हा उपक्रम कलंबुशी गावात ग्रामीण कृषी कार्यानुभव कार्यक्रमांतर्गत बीएससी ॲग्रीकल्चरच्या विद्यार्थिनींकडून राबविण्यात आला होता. तीन महिने गावात राहून प्रत्यक्ष प्रात्यक्षिकातून शेतीचे धडे घेतले जाणार आहेत, अशीही माहिती कृषी विद्यालयाकडून देण्यात आली.

शेतकऱ्यांना किती काबाडकष्ट करावे लागतात. याचे ज्ञान व माहिती विद्यार्थ्यांना असणे आवश्यक आहे. यासाठी कृषी विद्यालयाच्या विद्यार्थ्यांसाठी या सहशालेय उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यात शेतातील भाताची रोपे कशी काढावीत, नांगरणी कशा पद्धतीने केली पाहिजे, शेतीची मशागत पद्धत कशी असावी, भात लावणीसाठी पावसाचे पडणारे पाणी शेतात किती प्रमाणात आवश्यक आहे, आधुनिक पद्धतीने शेती कशी केली जाते, याविषयीचे कृषी विद्यालयाच्या शिक्षकांकडून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात

## अलिबागमधून दुचाकी लंपास

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

श्रीबाग येथील घरासमोर उभी करून ठेवलेली दुचाकी लंपास करण्यात आली आहे. याप्रकरणी अलिबाग पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना मंगळवारी रात्री ते बुधवारी सकाळच्या दरम्यान घडली. श्रीबाग दोनमधील म्हाडा वसाहतीनजीक घरासमोर फिर्यादीने मंगळवारी रात्री साडेअकरा वाजण्याच्या सुमारास त्याची दुचाकी उभी केली होती. दुसऱ्या दिवशी बुधवारी सकाळी त्यांना जागेवर दुचाकी दिसली नाही. त्यांनी आजूबाजूला विचारणा केली, तरीही दुचाकी सापडली नाही. अखेर त्यांनी दुचाकी चोरीला गेल्याची तक्रार गुरुवारी अलिबाग पोलीस ठाण्यात केली.

# जिल्हा रुग्णालयात स्वच्छतेचा दिखावा

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**







जिल्हाधिकारी जिल्हा सामान्य रुग्णालयात भेट देणार असल्याने शुक्रवारी सायंकाळी रुग्णालयात स्वच्छतेचा दिखावा दिसून आला. दुपारपासून रुग्णालयातील कर्मचारी जिल्हाधिकाऱ्यांच्या स्वागताला लागले होते. रुग्णालयात दुपारनंतर सुरु असलेल्या साफसफाईबाबत रुग्णांच्या नातेवाईकांसह रुग्णांनी आश्चर्य व्यक्त केले. त्यात कर्मचारीदेखील त्यांच्या गणवेशात असल्याचे दिसून आले.

जिल्हा रुग्णालयातील स्वच्छता राखण्यासाठी एक स्वतंत्र यंत्रणा निर्माण केली आहे. साफसफाईपासून रुग्णालय व त्याचा परिसर स्वच्छ ठेवण्याचे काम स्वच्छता कर्मचारी करतात. दुपारी साडेतीननंतर साफसफाई करताना हे कर्मचारी कधीच दिसून येत नाही.

रुग्णालयात अनेक वेळा वावरताना नाक दाबून राहण्याची वेळ कर्मचारी, रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांवर येते. परंतु, रायगडचे जिल्हाधिकारी किसन जावळे शुक्रवारी सायंकाळी जिल्हा रुग्णालयाला भेट देणार होते. त्यामुळे दुपारी दोन वाजेपर्यंत असलेल्या कर्मचाऱ्यांना थांबवून त्यांच्याकडून जिल्हाधिकारी येईपर्यंत स्वच्छता करण्यास सांगण्यात आले. स्वच्छतागृहापासून रुग्णालयातील परिसर साफ करण्याची लगबग रुग्णालयात दिसून आली. तसेच रुग्णालयातील गणवेशाविना कर्तव्य बजावणारे कर्मचारी आज गणवेशात दिसून आले. त्यामुळे रुग्णालयातील रुग्णांच्या नातेवाईकांना आश्चर्याचा धक्काच बसला. दरम्यान, जिल्हाधिकारी जावळे यांनी सायंकाळी चारनंतर रुग्णालयात प्रवेश केला. रुग्णालयातील इमारतीची पाहणी केली. डायलेसिस सेंटरच्या नूतनीकरणाचे काम पाहिले. त्यानंतर वेगवेगळ्या वॉर्डमध्ये जाऊन तेथील अडचणी जाणून घेतल्या. इमारतीचे कामकाज तातडीने करण्याबरोबरच त्यासाठी लागणाऱ्या निधीबाबतही सार्वजनिक बांधकाम विभाग व जिल्हा शल्यचिकित्सकांसोबत त्यांनी चर्चा केली. यावेळी डॉ. बास्टेवाड, रुग्णालयातील अधिकारी उपस्थित होते.

# सफाई कर्मचाऱ्यांचा स्वच्छता योद्धा म्हणून सन्मान

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

नेरळ ग्रामपंचायतीमधील गाव झोपलेले असताना भल्या पहाटे ग्रामपंचायत स्वच्छता कर्मचारी हे गाव स्वच्छ करण्याचे काम करतात. त्या कर्मचाऱ्यांना स्वच्छता योद्धा म्हणून सन्मानित करण्याची सामाजिक कार्यकर्ते संदीप म्हसकर यांची संकल्पना निश्चित सर्वांना प्रेरणादायी असल्याचे ग्रामपंचायत ग्रामविकास अधिकारी अरुण कार्ले यांनी यावेळी स्पष्ट केले.



नेरळ ग्रामपंचायत कार्यालयात स्वच्छता योद्धा सन्मान करण्याचा कार्यक्रम नेरळ ग्रामपंचायत कार्यलयात आयोजित करण्यात आला होता. यावेळी ४२ स्वच्छता कर्मचाऱ्यांना भेटवस्तू तसेच आर्थिक मदत आणि स्मृतिचिन्ह देण्याचा निर्णय घेतला होता. या कार्यक्रमासाठी भाजप कार्यकर्ते पंढरी हजारे, नितीन खैरनार, दत्ता ठमके, प्रणित ढोले यांनी भेटवस्तू वाटप कार्यक्रम सहभाग घेतला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संदीप म्हसकर यांनी केले.

# कृषी पंधरवड्यानिमित्त वृक्षारोपण

**। खांब । वार्ताहर ।**



कृषी पंधरवड्यानिमित्त विद्यार्थी ग्रामीण उद्योजकता जागृती विकास योजनेंतर्गत दापोली कृषी महाविद्यालयाच्या कृषी संजीवनी या ११ स्वयंसेवकांच्या गटाने खांब गावात वृक्षारोपण अभियान राबविले.

या अभियानांतर्गत प्रथम प्राथमिक शाळा खांब येथे वृक्षारोपणाची सुरुवात करण्यात आली. विद्यार्थ्यांना वृक्षारोपणाचे महत्त्व समजावून सांगण्यात आले आणि निसर्ग संवर्धनाची शपथ घेतली. त्यानंतर ग्रामपंचायत कार्यालयाच्या परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. तसेच श्री. रा.ग. पोटफोडे (मास्तर) विद्यालय खांब येथे वृक्षारोपण करण्यात आले. शाळेच्या अधिकाऱ्यांच्या सहकार्याने संपूर्ण शाळा परिसरात झाडे लावण्यात आली. विद्यार्थ्यांसोबत संवाद साधताना वृक्षारोपणाच्या प्रक्रिया समजावून सांगण्यात आल्या. या मोहिमेत मुख्याध्यापक आणि शिक्षक वर्गानेही सहभाग घेतला. या अभियानात एकूण ५१ झाडे लावण्यात आली.कृषीदूतांच्या या उपक्रमाद्वारे विद्यार्थ्यांसह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि स्थानिक ग्रामस्थांना वृक्षारोपणाचे महत्त्व पटवून देण्याचा उद्देश साधण्यात आला असल्याची माहिती कृषीदूतांकडून देण्यात आली.

## शिहुत आज रक्तदान शिबीर

**सुकेळी :** रक्तदान हेच खरे श्रेष्ठदान याच अनुषंगाने नागोठणेजवळच असलेल्या शिहु येथील डॉ. पुरुषोत्तम भोईर व डॉ. प्रिया भोईर यांनी दरवर्षीप्रमाणे यावर्षीही एक सामाजिक जबाबदारी व बांधिलकी म्हणून रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. अलिबाग येथील सरकारी रुग्णालय रक्तपेढी यांच्या सहकार्याने होणारे हे शिबीर रविवारी (दि.१४) सकाळी ८ ते १२ वाजेपर्यंत शिहू येथील डॉ. पुरुषोत्तम भोईर यांच्या निवासस्थानी होणार आहे. हे शिबीर सर्वांसाठी खुले असून, अधिकाधिक व्यक्तींनी सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

पान १ वरून

## पावसाचं ‘सर्जिकल’ स्ट्राईक

सर्जिकल वॉर्डमध्ये पाणीगळती झाली आहे. रुग्णांना हलवण्याचे काम सुरू केले आहे. पाण्याची गळती होऊ नये म्हणून सार्वजनिक बांधकाम विभागाच्या माध्यमातून प्लास्टिक टाकण्याचे काम लवकर सुरु करण्यात येणार आहे, अशी माहिती अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. शीतल जोशी यांनी कृषीवलशी बोलताना दिली.

**महामार्ग पाण्यात**

मुंबई-गोवा महामार्गाची अवस्थ अतिशय बिकट झाली आहे. रस्त्यावर ठिकठिकाणी पडलेल्या खड्ड्यांमुळे वाहतूक धीम्या गतीने सुरु होती. त्यामुळे राज्य परिवहनच्या वेळापत्रकावर त्याचा परिणाम दिसून आला. बस गाड्या उशिराने धावत असल्याने प्रवाशांची चांगलीच गैरसोय झाल्याचे दिसून आले. महाड-भोर-पंढरपूर-पुणे या शहरांना जोडणारा वरंध घाटातील रस्ता मुसळधार पावसामुळे असुरक्षित झाल्याने येथील वाहतूक बंद करण्यात आली आहे. तसे आदेशदेखील रायगड जिल्हाधिकारी यांनी दिले आहेत. मात्र, हे आदेश झुगारुन काही वाहनचालक आपला जीव धोक्यात घालून या मार्गावरुन प्रवास करीत आहेत. महाड येथील किल्ले रायगडावर शुक्रवारी वाळसुरे खिंडीमध्ये मोठ-मोठ्या दरडी पडल्या आहेत. सध्या येथील पायरी मार्ग जिल्हा प्रशासनाने बंद केला आहे. त्यामुळे कोणतीही हानी झालेली नाही. पोलिसांना पेट्रोलिंग करताना दरडी पडल्याचे लक्षात येताच त्यांनी याची माहिती आपत्ती विभागाला दिली आहे. सध्या पायरी मार्ग बंद केला आहे, पाऊस कमी झाल्यानंतर तेथील दरडी हटवण्याचे काम हाती घेण्यात येणार असल्याचे महाडचे प्रांताधिकारी ज्ञानोबा बानापुरकर यांनी ‘कृषीवल’शी बोलताना दिली.

**अलिबाग, माणगाव, पोलादपूर तळा येथे नुकसान**

दरम्यान, अलिबाग-बेलकडे जिल्हा परिषद शाळेचे छप्पर कोसळले असून रामराज गावात पाणी शिरले आहे. चिंचोटी येथील डोंगराचा काही भाग पडत असल्याने ग्रामस्थांचे स्थलांतर केले आहे. माणगाव तालुक्यात घराचे, गोठ्याचे नुकसान झाले आहे. पोलदापूर तालुक्यातील सहा गावांतील ६६ कुटुंबातील १७३ व्यक्तींना स्थलांतरीत केले आहे. तळा तालुक्यातील कडक्याची गणी या दरडग्रस्त गावातील १९ कुटुंबांतील ६८ नागरिकांना पीटसई कुणबी सभागृहात सुरक्षितपणे स्थलांतरीत केले आहे.

## आमदार चिखलात

लावल्यासारखे असून, अत्यंत लाजिरवाणी कृती असल्याची प्रतिक्रिया नेटकऱ्यांनी व्यक्त केली आहे. हा कसला विजयाचा उन्माद करीत आहात, अशा संतप्त शब्दात नेटकऱ्यांनी आमदारांसह त्यांच्या बगलबच्चांना फटकारले आहे.

## भराव नडला, तालुका पाण्यात बुडाला

अनेकांचे संसार उद्ध्वस्त झाले. त्यांना तात्पुरत्या स्वरूपात स्थलांतरित केले आहे. त्यांना पुन्हा संसार उभा करण्यासाठी आमदार साहेब आपण काय करणार? असा सवालही नुकसानग्रस्तांनी उपस्थित केला आहे.

पावसाळा सुरू झाला असून पाणी समुद्राला मिळण्याचे नैसर्गिक स्त्रोत भराव करून बुजविले आहेत. अनेक ठिकाणी पुराच्या पाण्यामुळे नागरिकांच्या जीविताला धोका असून त्याला जबाबदार कोण? असा प्रश्न यानिमित्ताने उपस्थित केला जात आहे.

## ‘कॅग’चे राज्य सरकारवर ताशेरे

पुनर्विनियोग पुरेशा औचित्याशिवाय प्राप्त झाल्यामुळे मोठ्या प्रमाणात अखर्चित राहिल्याबद्दलही अहवालात चिंता व्यक्त करण्यात आली आहे. एकूण तरतुदीपैकी १८.१९ टक्के निधी वापरात नाही. वर्षभरात झालेला एकूण खर्च मूळ अर्थसंकल्पापेक्षा सहा टक्के कमी होता आणि पुरवणी अर्थसंकल्प मूळ अर्थसंकल्पाच्या १५ टक्के होता, असे अहवालात नमूद केले आहे. या अहवालात राज्याच्या जमा आणि खर्चातील तफावत लक्षात घेता महसुली तूट दिसून आली आहे. त्याचवेळी उत्पन्नाचे स्रोत वाढवण्याची शिफारश करण्यात आली आहे. राज्यावरील कर्जाचा बोजा आठ लाख कोटींवर गेला आहे. कर्जाचे हे प्रमाण राजकोषीय कायद्यातील तरतुदीनुसार १८.१४ टक्के अपेक्षित आहे. हे प्रमाण वाढलं आहे. यापूर्वी घेतलेला कर्ज आता फेडावे लागणार आहे. यातूनच सरकारच्या तिजोरीवर अधिक बोजा वाढणार आहे, असं कॅगने निदर्शनास आणून दिले आहे.

## इंडिया आघाडीचा डंका

बद्रीनाथ, मंगलौर, पश्चिम बंगालमधील रायगंज, राणाघाट दक्षिण, बागदा आणि मानिकतला या १३ जागांवर पोटनिवडणूक घेण्यात आली होती. त्याचे निकाल शनिवारी जाहीर झाले.

ममता बॅनर्जी यांच्या नेतृत्वाखालील तृणमूल काँग्रेसने पश्चिम बंगालमधील सर्व चार जागांवर झालेल्या पोटनिवडणुकीत विजय मिळवला. कृष्णा कल्याणी, रायगंज (तृणमूल), मुकूट मनी अधिकारी, राणाघाट दक्षिण (तृणमूल), मधुपर्णा ठाकू, बगदा (तृणमूल), सुप्ती पांडे, मनिकताला (तृणमूल) अशी येथील विजयी उमेदवारांची नावे आहेत. इंडिया आघाडीत असलेल्या आम आदमी पक्षाने पंजाबच्या जालंधर पश्चिमेची जागा जिंकली आहे. येथून आपचे मोहिंदर भगत विजय झालेत. तर हिमाचल प्रदेशचे मुख्यमंत्री सुखविंदर सिंह सुक्खू यांच्या पत्नी कमलेश ठाकूर यांनी देहरा मतदारसंघातून विजय मिळवला. मध्य प्रदेशमधील अमरवाडा येथील पोटनिवडणुकीत भाजपचे कमलेश शहा विजयी झालेत. उत्तराखंडमध्ये भाजपला धक्का बसला आहे. येथील बद्रीनाथ आणि मंगलौर या दोन्ही जागांवर काँग्रेसने बाजी मारली आहे. बिहारमध्ये अपक्ष उमेदवार शंकर सिंह हे सुमारे ८ हजार मतांनी विजयी झाले आहेत. येथे जेडीयूला पराभवाचा धक्का बसला आहे.

हिमाचल प्रदेशातील देहरा येथून मुख्यमंत्री सुखविंदर सिंह सुक्खू यांच्या पत्नी कमलेश ठाकूर यांनी विजय मिळवला आहे. तर हमीपूर येथील जागा भाजपने मिळवली आहे. येथे भाजपचे आशिष शर्मा विजयी झालेत. तर काँग्रेसचे हरदीप सिंह बावा यांनी नालागढ येथून विजय मिळवला आहे. तामिळनाडूतील विकवंडी जागा डीएमकेचे उमेदवार अन्नीयूर सिया यांनी जिंकली आहे.

# सरपंच पोटफोडे यांच्या वाढदिवसानिमित्त वृक्षारोपण

**। खांब। वार्ताहर ।**

रोहा तालुक्यातील गोवे ग्रामपंचायतीचे आदर्श सरपंच तथा नवजीवन शिक्षण प्रसारक मंडळ खांब या संस्थेचे चेअरमन महेंद्र पोटफोडे यांच्या वाढदिवसानिमित्त वृक्षारोपण कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न करण्यात आला.

या कार्यक्रमांतर्गत श्री. रा.ग. पोटफोडे (मास्तर) विद्यालय खांब व श्रमिक विद्यालय चिल्हे येथे विविध प्रकारच्या वृक्षांच्या रोपांची



लागवड करण्यात आली. तर, दोन्ही विद्यालयातील राष्ट्रीय हरित सेनेचे विद्यार्थी वर्गाने मोठ्या उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवून वृक्षारोपण करण्यात आलेली झाडे जगविण्याची शपथ घेतली. या वृक्षारोपण कार्यक्रमासाठी संस्थेचे संचालक संजय भिसे व सामाजिक कार्यकर्ते दिलीप शर्मा यांनी विविध प्रकारच्या वृक्षांची रोपे देऊन सहकार्य केले. या कार्यक्रमात दोन्ही विद्यालयाचे मुख्याध्यापक व शिक्षक तथा शिक्षकेतर कर्मचारी यांनीही सहभाग घेऊन वृक्षारोपण केले.

# शेती शाळेत तज्ज्ञांचे शेतकऱ्यांना मार्गदर्शन

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**



केगाव उरण येथे शासनाच्या यूएनडीपी-जीसीएफ प्रकल्पातून भारताच्या तटीय समुदायाची हवामान लवचिकता वाढविणे व अंतर्गत भातपीक शेतीशाळा वर्ग क्र-२ हा कार्यक्रम राबविण्यात आला. यावेळी कर्जतच्या प्रादेशिक कृषी संशोधन केंद्राचे शास्त्रज्ञ नामदेव म्हसकर यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झालेल्या कार्यक्रमात कृषी शास्त्रज्ञ म्हसकर यांनी भातपीक रोपवाटिका आणि विविध प्रकारच्या भात लागवडीच्या पद्धती व जमिनीमध्ये घेण्यात येणाऱ्या विविध वाणांची माहिती यावेळी शेतकऱ्यांना दिली.

युरीया ब्रिकेटचा वापर तसेच नैसर्गिक शेतीबाबत माहिती व त्याबाबत मार्गदर्शनही केले. तर, तालुका कृषी अधिकारी अर्चना सूळ-नारनवर यांनी कृषी विभागाच्या योजना तसेच भातपीक स्पर्धेबाबत माहिती देऊन मार्गदर्शन केले. यावेळी तालुका कृषी अधिकारी अर्चना सूळ- नारनवर व कृषी शास्त्रज्ञ नामदेव म्हसकर यांच्या हस्ते शेतकऱ्यांना तुरीचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाला सरपंच जगजीवन नाईक, कृषी पर्यवेक्षक अलका बुरकुल, कृषी सहायक अदिका पानसरे तसेच मानकेश्वर नैसर्गिक शेतकरी गटातील शेतकरी उपस्थित होते.

## तरुणी बेपत्ता



**पनवेल :** राहत्या घरातून कोणास काही एक न सांगता एक तरुणी कुठेतरी निघून गेल्याने ती हरविल्याची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. मेहबुबी अब्दुल मुल्ला असे या तरुणीचे नाव असून, रंग गोरा, उंची ५ फूट ४ इंच, डोक्याचे केस काळे, डोळे काळे, नाक सरळ, चेहरा उभट, बांधा सडपातळ असून, अंगात पंजाबी ड्रेस घातलेला आहे. तिला मराठी व हिंदी भाषा अवगत आहे. या तरुणीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी पनवेल शहर पोलीस ठाणे येथे संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे.

# पावसामुळे जनजीवन विस्कळीत

। अलिबाग । प्रतिनिधी ।

रायगड जिल्ह्यात शुक्रवारी (दि.१२) सायंकाळपासून पावसाने जोर धरला असून दुसऱ्या दिवशी शनिवारीदेखील पाऊस कायमच सुरु राहिला होतो. जिल्ह्यातील अलिबाग, मुरूड किनारपट्टीला या पावसाचा मोठ्या प्रमाणात फटका बसला असून अलिबाग–रोहा तसेच अलिबाग–रेवदंडा मार्गावर पाणीच पाणी झाले होते. येथील अनेक सखल भागांत पाणी साचल्याने जनजीवन विस्कळीत झाले असून वाहतूकीवरही त्याचा परिणाम झाला होता. दरम्यान, काही ठिकाणी रस्त्याने जाणाऱ्या येणाऱ्या वाहन चालकांच्या सुरक्षेसाठी येथील स्थानिक धावून आले होते.












● (सर्व छायाचित्रे : समीर मालोदे, प्रमोद जाधव)




























## सिडकोकडून विमानतळबाधितांच्या मागण्या प्रलंबित

# प्रकल्पग्रस्तांचे जलसमाधी आंदोलन

। पनवेल । प्रतिनिधी ।

सिडको, राज्य शासन व अदानीच्या त्रासाला कंटाळून नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळबाधित प्रकल्पग्रस्तांची सिडको व अदानी कंपनीकडून नवी मुंबई विमानतळ प्रकल्पग्रस्तांवर होणाऱ्या अत्याचाराच्या निषेधार्थ १२ जुलै रोजी ओवळे फाटा येथील खाडीत जलसमाधी आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात शेकडो प्रकल्पग्रस्त सहभागी झाले होते.

यावेळी नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळामध्ये स्थानिक प्रकल्पग्रस्तांना नोकरी व रोजगार मिळाला पाहिजे. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ भराव, नदीपात्रामुळे पूरग्रस्त व ब्लास्टिंगमुळे ओवळे, दापोली, पारगाव, डुंगी, भंगारपाडा या गावांचे पुनर्वसन त्वरित करावे. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला जमीन संपादन करून सहा वर्षे झाली त्याची नुकसानभरपाई द्यावी. यूडीसीपीआर येण्यास उशीर झाल्याने बांधकाम परवानगी वाढवून देणे, या मागण्यांसाठी प्रकल्पग्रस्तांनी ओवळे खाडीमध्ये



जलसमाधी आंदोलन केल होते. यावेळी सिडकोविरोधात घोषणा देण्यात आल्या. प्रत्येक गावाला खेळाचे मैदान मिळाले पाहिजे, विमानतळाला दि.बा. पाटील यांचे नाव त्वरित द्यावे, यादेखील मागण्या करण्यात आल्या.

यावेळी पोलिसांनी त्यांना समजावण्याचा प्रयत्न केला. मात्र, सिडकोचे अधिकारी आल्याशिवाय आम्ही बाहेर निघणार नाही अन्यथा याच खाडीत जलसमाधी घेऊ, असे प्रकल्पग्रस्तांनी सांगितले. त्यानंतर सिडकोचे अधिकारी येऊन त्यांनी प्रकल्पग्रस्तांच्या मागण्या ऐकून घेऊन त्यांना आश्वासित केले.

येत्या ३० तारखेला मागण्या मान्य झाल्या नाहीत तर आणखी उग्र आंदोलन, कामबंद आंदोलन केले जाईल, असा इशारा यावेळी देण्यात आला.

"Visit Hirwal Education Trust first before exploring other options for your educational needs.
HIRWAL EDUCATION TRUST
ADMISSIONS OPEN
2024-2025
Degree Colleges Affiliated to University of Mumbai
COLLEGE OF SCIENCE
( COMPUTER SCIENCE & INFORMATION TECHNOLOGY )
(NAAC Accredited with 'B' Grade)
HIRWAL RATRA MAHAVIDYALAYA
HIRWAL LAW COLLEGE
L.L.B. (5 YEARS) | B.Sc.IT | B.Sc.CS
B.M.S. | B.Sc. | B.Com
Our USP
• Pioneering Law College in Mahad
• Well equipped classrooms
• State-of-the-art Science labs
• State-of-the-art computer labs
• Industrial Placement Assistance
• Skill Development Courses
• Scholarship Facility
• Personal Counseling
Website: www.hirwaleducationtrust.com
Address : Hirwal Education Trust Campus, Mumbai-Goa Highway, Behind Dharia Petrol Pump, Mahad-Raigad. 402301
Contact No.
9011768522 I 7276790213
8308379867
Enroll Now

# तळा रुग्णालयाचे भिजत घोंगडे

## ■ स्थानिक आमदार लक्ष देणार का? ■ तालुक्यात आरोग्य व्यवस्थेचा उडाला बोजवारा

। तळा । वार्ताहर ।

**तळा शहरातील ग्रामीण रुग्णालयाच्या उद्घाटनाला दोन वर्षे उलटूनही हे रुग्णालय अद्यापही सुरू करण्यात आलेले नाही. तळा तालुक्यात आरोग्य विभागाचा ढिसाळ कारभार सुरू असून तालुक्यातील आरोग्य व्यवस्थेचा अक्षरशः बोजवारा उडाला आहे. तालुक्यात एक ग्रामीण रुग्णालय, तीन प्राथमिक आरोग्य केंद्र व पाच उप केंद्रे यांसह बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना देखील आहे.**




तालुक्यात आरोग्य व्यवस्थेसाठी एवढा मोठा व्यापक पसारा असून देखील सोयी सुविधांच्या बाबतीत या सर्व विभागांची दयनीय अवस्था झाली असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. यातील ग्रामीण रुग्णालयाचे दोन वर्षांपूर्वी २८ जून रोजी तत्कालीन पालकमंत्री व विद्यमान महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले होते. तसेच, आठवडा भरात या ठिकाणी अधिकारी व कर्मचारी वर्ग उपलब्ध करून हे रुग्णालय सुरू करण्यात येईल, असे आश्वासन मंत्री आदिती तटकरे यांनी दिले होते. आज या गोष्टीला दोन वर्ष पूर्ण होऊनही या ठिकाणी अधिकारी व कर्मचारी वर्ग भरले गेले नसून हे ग्रामीण रुग्णालयही सुरू करण्यात आलेले नाही.

तालुक्यातील तळा, मांदाड, महागाव या तीन प्राथमिक आरोग्य केंद्रांची रिक्त पदांमुळे बिकट अवस्था झाली आहे. शहरात असलेल्या तळा प्राथमिक आरोग्य केंद्रात रिक्त पदे कमी प्रमाणात असल्यामुळे या ठिकाणचा कारभार कसातरी हाकला जात आहे. मात्र, मांदाड आणि महागाव प्राथमिक आरोग्य केंद्रात अद्याप पदे भरली गेली नाहीत. त्यामुळे या दोन्ही केंद्रांची अत्यंत दयनीय अवस्था झाली असून या ठिकाणी आरोग्याची सुविधा असूनही नसल्यासारखी आहे. उपकेंद्रांची देखील तीच अवस्था आहे. तसेच, बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना हा आड बाजूला पडत असून हा दवाखाना गेल्या सहा महिन्यांपासून बंद अवस्थेत आहे. अशा कारणांमुळे आरोग्य यंत्रणेचा पुरता बोजवारा उडाला असून सर्पदंश तसेच सर्वसाधारण दुखपतीसाठी देखील रुग्णांना उपजिल्हा रुग्णालय माणगाव येथे हलवावे लागत आहे. यामुळे काहीवेळा वेळीच उपचार न मिळाल्याने रुग्णांच्या जीवितास धोका निर्माण होण्याची शक्यता आहे.

# ३४ वर्षीय महिलेने दिला तिळ्या बाळांना जन्म

। नवी मुंबई । वृत्तसंस्था ।

गुंतागुंती गर्भधारणा असलेल्या ३४ वर्षीय महिलेने खारघरच्या मेडिकवर हॉस्पिटलमध्ये तीन बाळांना जन्म दिला आहे. यापैकी दोन मुले आणि एक मुलगी आहे. खारघरच्या मेडिकवर हॉस्पिटल येथील डॉ. रोहिणी खेरा भट्ट, डॉ. स्वप्नील पाटील, डॉ. वृक्षल शामकुवार आणि डॉ. जयश्री व्यंकटेशन यांच्या टिमने प्रसंगावधान राखत यशस्वीरित्या या तीनही गर्भधारणेचा योग्य व्यवस्थापन केले.

रीता कुमार (नाव बदलले आहे) या वाशी येथील रहिवासी असून आयव्हीएफ प्रक्रियेद्वारे ही तिची पहिलीच गर्भधारणा होती आणि त्यांच्या पोटात तिन गर्भ होते. या जोडप्याने गेली कित्येक वर्षे नैसर्गिकरित्या गर्भधारणेसाठी प्रयत्न केला होता. परंतु, सकारात्मक परिणाम दिसून आले नाहीत. पोटात तिन गर्भ असणे ही एक दुर्मीळ घटना असून ती गुंतागुंतीची असते आणि आईच्या शरीरात अनेक बदल घडत असतात. या गर्भधारणेत तीन पैकी दोन बाळांना एक नाळ होती. गर्भधारणेच्या २८ व्या आठवड्यात ओटीपोटात दुखत असल्याने या रुग्णाने मेडिकवर हॉस्पिटल येथील स्त्रीरोग व प्रसुती तज्ज्ञ डॉ. रोहिणी खेरा भट्ट यांची भेट घेतली. २ आठवड्यांपासून वेदना जाणवत असल्याने लगेचच अल्ट्रासाऊंड तपासणी करण्यात आली, ज्यात असे दिसून आले की तिच्या गर्भाशयाचे मुख अतिशय लहान आहे आणि गर्भाशय मुखाला टाके असूनही त्याचे तोंड उघडू लागले आहे. ही प्रक्रिया तिच्या नवी मुंबईतील खाजगी आयव्हीएफ केंद्रात केली होती.

या प्रकरणात गर्भवती महिलेला पूर्णपणे विश्रांती घेण्याचा सल्ला देण्यात आला. तसेच, विशेष औषधोपचार आणिगर्भाशयाच्या मुखाची लांबी कमी झाल्यामुळे कोणताही संसर्ग होऊ नये म्हणून प्रतिजैविके आणि आई आणि बाळ दोघांची नियमित तपासणी करून गर्भधारणा शक्य तितकी लांबवण्याचा निर्णय घेण्यात आला.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या नोटीसीने असे कळविण्यात येते कि, माझ्या अशिलांनी मौजे भेरसे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील श्री. मनोज लक्ष्मण मुरुडकर वगैरे १, रा. चेंढरे-अलिबाग यांच्या खुद्द मालकीची खालील वर्णनाची जमीन मिळकत खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

१) मौजे : भेरसे, ता.अलिबाग, जि. रायगड येथील भूमापन क्रमांक ४३९, क्षेत्र : ०-०५-१० हे.आर + पो.ख. ०-०३-०० हे.आर एकूण क्षेत्र ०-०८-१० हे.आर, आकार रु. ०.०८ पैसे.

तरी, वर वर्णन केलेली मिळकत विद्यमान मालकांचे ताबे कब्जा वहिवाटीत, निर्वेध, बोजा विरहित, विकण्यायोग्य असल्याची हमी विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिली आहे. तरी वरील मिळकतीसंदर्भात कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास अथवा त्यांची या व्यवहारास हरकत असल्यास आपली हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासहित ही नोटीस प्रसिध्द झाल्या दिनांकापासून १४ दिवसांचे आत माझेकडे लेखी पुराव्यानिशी देऊन माझी खात्री पटवून द्यावी. विहित मुदतीत अशी कोणतीही हरकत न आल्यास माझे अशील त्यांचा संदर्भित मिळकतींचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशीलंवर बंधनकारक राहणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण :- अलिबाग
दिनांक :- १३/०७/२०२४

सही /-
**ॲड. समाधान रविंद्र पाटील.**
मु.पो. वेश्वी, हनुमान मंदिर जवळ,
ता. अलिबाग, रा. रायगड
मोबा. नं. ८९८३०११९६९

# जिल्ह्यात स्वच्छतेचे दोन रंग मोहीम राबवावी

## मुख्य कार्यकारी अधिकारी बास्टेवाड यांचे प्रतिपादन

। खास । प्रतिनिधी रायगड ।

मान्सूनमध्ये जिल्हयांतील ग्रामपंचायत स्तरांवरील पिण्याच्या पाण्याची गुणवत्ता राखून जनतेला शुद्ध व स्वच्छ पाणी नियमित व पुरेशा प्रमाणात उपलबध करून देण्याकरिता केंद्र व राज्य शासनाच्या मार्गदर्शक सुचनेनसुार जिल्हयांत स्टॉप डायरिया अभियान राबविले जात आहे. या अभियानामध्ये गावातील प्राथमिक शाळा, अंगणवाडी, प्राथमिक आरोग्य केंद्रातील पिण्याच्या पाण्याची गुणवत्ता तपासण्यात येणार आहे. पावसाळयामध्ये दूषित पाणी पिऊन डायरिया, गॅस्ट्रो व कावीळ यासारखे अनेक जलजन्य आजार होतात. त्यामुळे पिण्याचे पाणी निर्जुंतुकीकरण करून पिण्यासाठी वापरल्यास या आजारांना दूर ठेवता येईल. यासाठी गावस्तरांवर विविध उपक्रम घेऊन लोकांमध्ये जनजागृती करण्यात यावी यासाठी सर्व विभागाने समन्वयाने काम करावे, असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.भरत बास्टेवाड यांनी जिल्हास्तरीय कार्यशाळेमध्ये उपस्थितांना मार्गदर्शन करताना केले. यावेळी प्रकल्प संचालक तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी पाणी व स्वच्छता शुभांगी नाखले, जिल्हा सर्वेक्षण अधिकारी (आरोग्य) वंदनकुमार पाटील, प्रकल्प व्यवस्थापक आर्थिक (जजीमि) संगीता पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

पाणी गुणवत्ता सल्लागार अदिती मगर यांनी अभियान कालावधीत राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रम, किटद्वारे पिण्याच्या पाण्याची तपासणी याबाबत माहिती दिली. तर, नेहा थळे यांनी या अभियानांमध्ये विविध स्तरांवर घेण्यात येणारे जनजागृतीचे उपक्रम याबाबत उपस्थितांना मागदर्शन केले. यावेळी स्वच्छ भारत मिशन कार्यक्रमांतर्गत 'स्वच्छतेचे दोन रंग', 'ओला हिरवा सुका निळा' या अभियानाबाबत संवाद तज्ञ सुरेश पाटील यांनी उपस्थितांना मागदर्शन केले. या कार्यकमांचे प्रास्ताविक मनुष्यबळ विकास सल्लागार आनंद धिवर यांनी केले. तर, जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक जयवंत गायकवाड यांनी स्टॉप डायरिया अभियान व स्वच्छतेचे दोन रंग या दोनही अभियानाबाबत उपस्थितांना सविस्तर मार्गदर्शन करून रायगड जिल्हा प्रथम क्रमांकांवर अग्रेसर राहिल यासाठी सांघिक प्रयत्नांची आवश्यकता असल्याचे मत व्यक्त केले.

रोगप्रसार टाळण्यासाठी रोगप्रतिबंधात्मक उपाययोजनांना प्राधान्य देऊन जिल्हयांतील प्रत्येक गावाने या अभियानात सहभाग घेऊन अभियान यशस्वी करावे असे आवाहन पमुख्य कार्यकारी अधिकारी शुभांगी नाखले यांनी केले.

## जाहीर नोटीस

माझे आशील यांनी दिलेल्या माहिती वरून व सांगितले वरून त्यांचे तर्फे सर्व लोकांस जाहीर नोटीशीने कळविणेत येते ते खालील प्रमाणे:-

**मौजे कामथ ता.अलिबाग, जि. रायगड हद्दीतील खालील वर्णनाची मिळकत.**

| मौजे | गट नं. | क्षेत्र आर. | आकार रू.पैसे |
|---|---|---|---|
| कामथ | ३७८ | १.४०.०० | २८.१६ |

येणे प्रमाणे वर्णनाचे मिळकतीपैकी ०.३०.४६ एकक हे.आर चौरस मिटर इतके क्षेत्राची मिळकत श्री. चारूदत्त रामचंद्र भोईर, श्री. राजेंद्र रामचंद्र भोईर, श्री. अरविंद रामचंद्र भोईर, श्री. चंद्रकांत रामचंद्र भोईर यांचे सहमालकीची असून माझे आशील यांनी मिळकतीचे विद्यमान मालक श्री. चारूदत्त रामचंद्र भोईर, श्री. राजेंद्र रामचंद्र भोईर, श्री. अरविंद रामचंद्र भोईर, श्री. चंद्रकांत रामचंद्र भोईर, सर्व मु. कामथ, ता.अलिबाग, जि.रायगड यांचेपासून सदरहू मिळकतीपैकी ०.१७.० एकक हे.आर. चौरस मिटर इतके क्षेत्राची मिळकत त्यात असलेला झाड झाडोरा, वहिवाटीचे हक्क, वगैरे सह अशी मिळकत खरेदी घेणेबाबत बोलणी केली आहेत. मिळकतीचे विद्यमान मालक यांनी संदर्भित मिळकत त्यांचे मालकी हक्काची व निर्वेध असल्याचा भरवसा माझे आशिल यांस दिला असून सदरहू मिळकतीचे मालकी हक्काची तपासणी करण्यास संमत्ती दिली आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, दान वहीवाटीचे हक्क, लिन, कुळ वहिवाटस वा दुरान्वये संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांजकडे नोटीस प्रसिध्द झाल्या पासून १४ दिवसांचे मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कोणाचीही, कसलीही हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजुन आमचे आशील व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

अलिबाग
तारीख १२.०७.२०२४

**(ॲड. एस. वाय. बारटके)**
मु.पो. ता.अलिबाग, जि.रायगड

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**-मुख्य संपादक**

# जिल्हा रुग्णालयात 'जागतिक लोकसंख्या दिन' साजरा

। रायगड । प्रतिनिधी।

कुटुंब नियोजन पद्धतीचा तसेच विविध प्रभावी माध्यमांचा उपयोग करून जनतेमध्ये प्रचार व प्रसार करण्यासाठी जिल्हा सामान्य रुग्णालय व आरोग्य विभाग रायगड जिल्हा परिषद यांच्या सयुंक्त विद्यमाने जिल्हा रुग्णालयात ११ जुलै हा दिवस 'जागतिक लोकसंख्या दिन' साजरा करण्यात आला.



जागतिक लोकसंख्या दिनाच्या पार्श्वभूमीवर आयोजित कार्यक्रमात मार्गदर्शन करताना जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अंबादास देवमाने यांनी अनावश्यक गर्भधारणा, माता मृत्यू तसेच नवजात बालकांच्या आरोग्यावर होणारे नकारात्मक परिणाम टाळणे महत्वाचे असल्याचे सांगत कुटुंब नियोजनाच्या सेवा देण्यात येत आहेत, त्याबाबत समाजात जनजागृती करणे गरजेचे आहे, असे सांगितले.

संयुक्त राष्ट्र संघाने १९८९ साली जागतिक लोकसंख्या दिन साजरा करण्याची घोषणा केली होती. पहिला लोकसंख्या दिन ११ जुलै १९९० रोजी साजरा करण्यात आला. त्या अनुषंगाने केंद्र व राज्य शासनाने सूचित केल्यानुसार नियोजित उपक्रम संपूर्ण जिल्ह्यात राबवण्यात येत असून २७ जून ते १० जुलै या दरम्यान 'दाम्पत्य संपर्क पंधरवडा' साजरा करण्यात आला. तसेच ११ जुलै ते २४ जुलै दरम्यान 'लोकसंख्या स्थिरता पंधरवडा' साजरा करण्यात येणार असल्याबाबत डॉ. किरण शिंदे यांनी सांगितले. या कार्यक्रमाच्या अनुषंगाने सकाळी अलिबाग शहरामध्ये जनजागृतीपर प्रभातफेरीचे आयोजन करण्यात आले होते.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, आमच्या अशिलांनी खाली वर्णन केलेली मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक श्री. मुकेश कांतिलाल शाह व श्री. सौमील मयूर गांधी रा. मुंबई यांचेकडून कायम विकत घेण्याचे ठरविलेले आहे. खालील वर्णन केलेली मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी दिल्यावरून आमच्या अशिलांनी सदरचा व्यवहार ठरविला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर) | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| तुडाळ, ता. अलिबाग | ८/८ | ०-०७.५०<br>पो.ख.०-०१.६०<br>०-०९.१० | १.१८ |

वरील मिळकत व त्या मिळकतीवर बांधलेले गट ग्रामपंचायत थळ ता. अलिबाग, जि. रायगड घर मालमत्ता क्र. ३२६ क्षेत्र २७२ चौ. फुट ही मिळकत जाहीर नोटीसीचा विषय आहे

तरी सदर मिळकतीबाबत अन्य कोणाचा कसलाही हक्क, हितसंबंध, बोजा, अथवा गहाण, दान, लिज, पोटगी, साठेकरार, मेन्टेनन्स, मेहेर, कर्ज, बयाणापावती, पोटगी, लीन, चार्ज, बक्षीस, मृत्यूपत्रांकीत दान वगैरे असल्यास अथवा हरकत असल्यास अशा व्यक्तींनी सदर हरकती संबंधीच्या लेखी प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह आपली हरकत खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून चौदा दिवसांचे आत आणून द्यावी. याप्रकारे ठरलेल्या मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची कसलीही हरकत आली नाही तर सदर मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे अशील सदर व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर वर वर्णन केलेल्या मिळकती बाबत कोणाचीही कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही हे सर्वांस कळावे.

अलिबाग,
दि. १३/०७/२०२४

**ॲड. मनोज प्रभाकर पाटील**
शॉप नं. ११, भास्कर को. ऑप. हौसि. सोसा.,
रामनाथ रोड, चेंढरे, ता. अलिबाग, जि. रायगड.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमच्या अशिलांनी सौ. निलिमा पांडुरंग पाटील रा. गुड्डी अपार्टमेंट, ब्लॉक नं. ०९, वरदान गॅस एजन्सी शितल विहार, ता.पेण, जि. रायगड यांचे मालकीची जमिन कायमस्वरूपी खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या जमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे-

| गाव | मालक | गट क्रमांक व उपविभाग | एकूण क्षेत्र हे.आर | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|---|
| बोरगाव | सौ. निलिमा पांडुरंग पाटील | १६४/३ | ०.२०.०० | ०.३१ |

वर वर्णन केलेली जमिन मिळकत ही आमचे अशिल कायमस्वरूपी खरेदीखताने विकत घेत आहेत.

तरी वरील मिळकतीच्या बाबतील कोणाचीही कुळ, वहीवाट, ताबा, बयाणा पावती साठेकरार, खरेदीखत, गहाणखत, बोजा, भाडेपट्टा, मृत्युपत्रातील दान, जप्ती, लीज अथवा अन्य प्रकारची कायदेशीर हक्क हितसंबंधन असल्यास ही नोटिस प्रसिध्द झाल्यापासुन ०७ (सात) दिवसांच्या आत माझ्याकडे लेखी पुराव्यानिशी येवुन माझी खात्री पटवुन द्यावी. विहीत मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास आमचे अशिल मिळकतीचे रजिस्टर्ड खरेदीखत करतील व मागाहुन येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची नोंद घ्यावी.

पेण
दि.१४-०७-२०२४

सही/-
**ॲड. सुशांत श्याम पाटील,**
पोयनाड आंबेपुर, सोमवार बाजार पेठ,
न्यु रोड, पोयनाड आंबेपुर तळयासमोर,
अलिबाग,रायगड-४०२१०८
मो.९८८१९४२५९१

## शिक्षक पाहिजे

अंजुमन हिमायतुल इस्लाम रायगड - महाड या अल्पसंख्यांक संस्थेच्या अंजुमन हिमायतुल इस्लाम भाईमियाँ इसाने उर्दू हायस्कूल व डॉ. ए. ए. देशमुख ज्यू. कॉलेज, महाड या उर्दू माध्यमाच्या कनिष्ठ महाविद्यालयामध्ये २० % अंशतः अनुदानित तत्त्वावर खालीलप्रमाणे शिक्षकांची आवश्यकता आहे.

| अ.क. | शै. अर्हता | विषय | संख्या |
|---|---|---|---|
| १. | M.A. - B.Ed | English | ०१ (पुर्णवेळ) |
| २. | M.Com - B.Ed | वाणिज्य (O. C. / B.K) | ०१ (पुर्णवेळ) |

तरी इच्छुक उमेदवाराने आपले अर्ज मूळ कागदपत्रांच्या छायांकित प्रतिसह शनिवार दि. २०.०७.२०२४ रोजी ठिक १०.३० वा. खालील पत्त्यावर उपस्थित राहावे.

पत्ता
सचिव
अंजुमन हिमायतुल इस्लाम रायगड - महाड
एस.टी. स्टँड समोर, महाड
मु. पो. ता - महाड; जि - रायगड पिन : ४०२३०१
मो. -९४२२४९४९७५/९९६०००७८४०
E-Mail Id : anjumanislammahad@gmail.com

## जाहीर नोटीस

दि. १३/०७/२०२४

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने असे सुचीत करण्यात येत आहे की, आमचे अशिल यांनी मौजे निंबोडे, ता. खालापूर जि. रायगड येथील

| अ.क्र. | मालकाच नाव | सर्व्हे व हिस्सा क्र. | क्षेत्रफळ | आकार |
|---|---|---|---|---|
| १ | श्री.दत्त धमा कातकरी वैगेरे | २६/१/ब | ०-४८-१ | १-५७ |
| २ | श्री.दत्त धमा कातकरी वैगेरे | २६/२/अ | ०-८०-० | ९-३९ |
| ३ | श्री.एकनाथ लक्ष्मण वाघमारे वैगेरे | २४/३/अ | १-४६-० | २-१३ |
| ४ | श्री.संतोष विष्णु कातकरी वैगेरे | १९/२/अ/१ | ०-८०-० | ५-१४ |
| ५ | श्री.गजानन पांडुरंग कातकरी वैगेरे | २२/१/अ | ०-९९-० | ०-९३ |
| ६ | श्री.संतोष विष्णु कातकरी वैगेरे | २०/१/अ | १-१६-२० | १-०९ |

च्या शेतजमीन मिळकती विद्यमान मालक यांचे कडून कायम स्वरुपी खरेदी करावयाच्या ठरविलेल्या आहेत. तसा उभयतांमध्य व्यवहार घडुन आलेला आहे.

तरी उपरोक्त शेतजमीन मिळकतीमध्ये कोणाही व्यक्तीचा कसलाही अगर ताबा, बयाणापावती, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीन, लीज, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास सदरील नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसाचे आत खाली सही करणार अधिवक्ता यांचे कडे आपल्या हरकती पुराव्यासह लेखी स्वरूपात दाखल करावयात सदर मुदतीत हरकती न आल्यास उपरोक्त शेतजमीन मिळकतो निर्वेध व बोजारहीत आहे. असे समजुन इतर कोणाही व्यक्तींचा कसलाही कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध नाही. व असल्यास ते जाणीवपुर्वक आमचे अशिलांचे लाभात सोडुन दिलेले आहेत. असे समजुन कायदेशिर बाबींची पुर्तता करून आमचे अशिल उपरोक्त शेतजमीन मिळकती संदर्भातचा खरेदी व्यवहार पुर्ण करतील आणि मग मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत वा तक्रार आमचे अशिल यांचेवर बंधनकारक राहणार नाही. याची या जाहीर नोटीसने तमाम जनतेने नोंद घ्यावी. येणे प्रमाणे जाहीर नोटीस आहे.

**ॲड. प्रमोद नथुराम सुर्वे**
रा. ''मातोश्री'' निवास आवळस, ता. कर्जत,
जि. रायगड भ्रमनध्वनी क्र. ०९८८१५७९५५५

## कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड
(भारत सरकारचा उपक्रम)

सादर सेवा

**खुली ई-निविदा मागविणारी सूचना दिनांक 12.07.2024**

कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लि. च्या वतीने, वरिष्ठ विभागीय अभियंता, रत्नागिरीद्वारा खालील कामासाठी खुली ई-निविदा आमंत्रित करण्यात येत आहे.

**अनु. क्र. 1: कामाचे नाव:** एसएसई\माणगाव विभागांतर्गत टर्नआऊट्सचे ओव्हरहॉलिंग. (**निविदा क्रमांक:** केआर-आरएन-डब्ल्यू-2024-14). **अंदाजे मूल्य:** ₹ 18,13,084/- **ईएमडी:** ₹ 36,300/- **निविदा ऑन लाईन सादरीकरणासाठी शेवटचा दिनांक आणि वेळ: 06/08/2024** रोजी **15.00 वा.**

**अनु. क्र. 2: कामाचे नाव:** एसएसई/विलवडे विभागांतर्गत ट्रॅकवरील तण काढणे. (**निविदा क्रमांक:** केआर-आरएन-डब्ल्यू-2024-19). **अंदाजे मूल्य:** ₹ 18,37,480/- **ईएमडी:** ₹ 36,800/- **निविदा ऑन लाईन सादरीकरणासाठी शेवटचा दिनांक आणि वेळ: 06/08/2024** रोजी **15.00 वा.**

**अनु. क्र. 3: कामाचे नाव:** एसएसई/रत्नागिरी विभागांतर्गत ट्रॅकवरील तण काढणे. (**निविदा क्रमांक:** केआर-आरएन-डब्ल्यू-2024-18). **अंदाजे मूल्य:** ₹ 9,48,935/- **ईएमडी:** ₹ 19,000/- **निविदा ऑन लाईन सादरीकरणासाठी शेवटचा दिनांक आणि वेळ: 06/08/2024** रोजी **15.00 वा.**

**अनु. क्र. 4: कामाचे नाव:** एसएसई/चिपळूण विभागांतर्गत ट्रॅकवरील तण काढणे. (**निविदा क्रमांक:** केआर-आरएन-डब्ल्यू-2024-17). **अंदाजे मूल्य:** ₹ 17,61,628/- **ईएमडी:** ₹ 35,200/- **निविदा ऑन लाईन सादरीकरणासाठी शेवटचा दिनांक आणि वेळ: 06/08/2024** रोजी **15.00 वा.**

**अनु. क्र. 5: कामाचे नाव:** एसएसई/कणकवली विभागांतर्गत ट्रॅकवरील तण काढणे. (**निविदा क्रमांक:** केआर-आरएन-डब्ल्यू-2024-20). **अंदाजे मूल्य:** ₹ 20,73,665/- **ईएमडी:** ₹ 41,500/- **निविदा ऑन लाईन सादरीकरणासाठी शेवटचा दिनांक आणि वेळ: 06/08/2024** रोजी **15.00 वा.**

**अनु. क्र. 6: कामाचे नाव:** एसएसई/माणगाव विभागांतर्गत ट्रॅकवरील तण काढणे. (**निविदा क्रमांक:** केआर-आरएन-डब्ल्यू-2024-16). **अंदाजे मूल्य:** ₹ 25,86,292/- **ईएमडी:** ₹ 51,700/- **निविदा ऑन लाईन सादरीकरणासाठी शेवटचा दिनांक आणि वेळ: 06/08/2024** रोजी **15.00 वा.**

**अनु. क्र. 7: कामाचे नाव:** जीपीएस पीसी आधारित ओएमएस मशीनसाठी दुरुस्ती आणि देखभाल करार. (**निविदा क्रमांक:** केआर-आरएन-डब्ल्यू-2024-21). **अंदाजे मूल्य:** ₹ 1,65,000/- **ईएमडी:** ₹ 3,300/- **निविदा ऑन लाईन सादरीकरणासाठी शेवटचा दिनांक आणि वेळ: 06/08/2024** रोजी **15.00 वा.**

**अनु. क्र. 8: कामाचे नाव:** एसएसई\चिपळूण विभागांतर्गत टर्नआऊट्सचे ओव्हरहॉलिंग. (**निविदा क्रमांक:** केआर-आरएन-डब्ल्यू-2024-13). **अंदाजे मूल्य:** ₹ 11,17,225/- **ईएमडी:** ₹ 22,400/- **निविदा ऑन लाईन सादरीकरणासाठी शेवटचा दिनांक आणि वेळ: 06/08/2024** रोजी **15.00 वा.**

अधिक माहितीसाठी क्षेत्रीय रेल्वे व्यवस्थापक, कार्यालय, एमआयडीसी क्षेत्र, मिरजोळे, रत्नागिरी कार्यालयाशी संपर्क करा. (**संकेतस्थळ: https://www.ireps.gov.in)**

## यूनियन बैंक ऑफ इंडिया | Union Bank of India

भारत सरकार का उपक्रम A Government of India Undertaking

**स्ट्रेस्ड् ॲसेट मॅनेजमेंट ब्रॅन्च - मुंबई**
तळमजला, १०४, भारत हाऊस, एम.एस. मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०००२३
ई-मेल : samvmumbai@unionbankofindia.com

**स्थावर / जंगम मालमत्तांच्या विक्रीकरिता विक्री सूचना**

**सीक्युरिटायझेशन ॲन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल असेट्स ॲन्ड एन्फोर्समेंट ऑफ सीक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ सहवाचन सीक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम, २००२ च्या नियम ९ (१) च्या तरतूदीसह सदर अंतर्गत स्थावर मालमत्तेच्या विक्रीकरिता ई-लिलाव विक्री सूचना.**

तमााम जनतेस तसेच विशेषत: कर्जदारांना व हमीदारांना याद्वारे १५ दिवसांची सूचना देण्यात येत आहे की, प्रतिभूत धनकोंकडेगहाण/प्रभारित खालील निर्देशित स्थावर / जंगम मालमत्ता जिचा ताबा युनियन बँक ऑफ इंडिया (प्रतिभूत धनको) यांच्या प्राधिकृत अधिकाऱ्यांद्वारे घेण्यात आला आहे त्या मालमत्तेची युनियन बँक ऑफ इंडिया यांना खालील निर्देशित संबंधित कर्जदार व हमीदारांकडून देय रकमेच्या वसुलीसाठी जशी आहे जेथे आहे, जी काही आहे तेथे आहे व विना अडथळा तत्त्वावर खाली दिलेल्या तारखेरोजी विक्री करण्यात येत आहे. राखीव मूल्य व इसारा रक्कम खालीलप्रमाणे नमूद आहे.

**लिलाव दिनांक व वेळ : दि. ३०.०७.२०२४ रोजी दु. १२.०० ते सायं. ५.००**

**कर्जदार, सहकर्जदार व हमीदाराचे नाव :**
**१. मे. ताराचंद इंटरनॅशनल प्रा. लि., पत्ता** १२, बेक हाऊस, २ रा मजला, २०१, एमसीसी लेन, फोर्ट, मुंबई -४०००२३ तसेच अन्य पत्ता : ३०३, ॲकॉर्ड इंटरनॅशनल कॉम्प्लेक्स, गोरेगाव स्टेशन रोड, बेस्ट बस डेपोच्या समोर, गोरेगाव (पूर्व), मुंबई - ४०० ०६३.
**२. श्री. विनोद ओ. कैन्या (नाव कन्फर्म करणे),** पत्ता : प्लॉट क्र. १०६/५, रेती बंदर, दारूखाना, रे रोड, मुंबई - ४०० ०१०.
**३. श्रीमती सुनीता व्ही. कैन्या (नाव कन्फर्म करणे),** पत्ता : प्लॉट क्र. १०६/५, रेती बंदर, दारूखाना, रे रोड, मुंबई - ४०० ०१०.

**देय रक्कम : रु. २२,१६,६२,०४६.२५ (रु. बावीस कोटी सोळा लाख बासष्ट हजार सेहेचाळीस व पंचवीस पैसे मात्र) अधिक दि.२४.०८.२०१५ पासून त्यावरील पुढील व्याज व अन्य प्रभार तसेच वैधानिक देणी.**

**मालमत्ता १** : प्लॉट विवरण सर्व्हे क्र. ५७, हिस्सा क्र. ३, गाव ठाणे व्हावे, तालुका खालापूर, खोपोली, जि. रायगड. मे. कैन्या स्टील कॉर्पोरेशन (प्रोप्रा. श्री. विनोद ओ. कैन्या) (एचआर ०-३९-२०) ३९२० चौ. मी. मालमत्तेच्या सीमा पुढीलप्रमाणे : **उत्तरेश** - टाकई अडोशी रोड, **दक्षिणेस** : मोकळा भूखंड, पूर्वेस : मोकळा भूखंड व पश्चिमेस : मोकळा भूखंड **(प्रत्यक्ष ताब्याअंतर्गत).**
**राखीव मूल्य** : रु. १,३३,००,०००.०० **जमा करावयाची इसारा रक्कम** : रु. १३,३०,०००.००
**मागणी सूचना दिनांक** : २४.०८.२०१५ **ताबा सूचना दिनांक** : १२.१२.२०१८
**विक्री सूचना दिनांक** : ०८.०७.२०२४
पुढील तपशिलाकरिता संपर्क : (कार्यालयीन वेळेत) फाइल हॅन्डलिंग ऑफिसर व प्राधिकृत अधिकारी: श्री. अभिषेक सिंग, मोबा. नं. ६३९२७४१७९१.

**सर्व मालमत्तांकरिता ई-लिलाव दिनांक व वेळ : दि. ३०.०७.२०२४ रोजी दु. १२.०० ते सायं. ५.००.**

**मालमत्तेच्या परीक्षणाचा दिनांक : २२.०७.२०२४**

नोंदणीकरण व लॉगइन व बोली नियमांकरिता भेट द्या : https://ebkray.in
विक्रीच्या विस्तृत अटी व शर्तीकरिता इच्छुक व्यक्तींनी बँकेची वेबसाइट
www.unionbankofindia.com येथेही भेट द्यावी.

ठिकाण : मुंबई

सही/-
**प्राधिकृत अधिकारी**
**युनियन बँक ऑफ इंडिया**

## ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

■ प्रथम, पुर्नविवाह, व्यंग, सर्वजातीय, आंतरजातीय वेबसाईटसह स्थळांसाठी रोहा गणेश महाकाळ ८८८८९३५७७५

■ शुभमूहूर्त विवाह मंडळ अलिबाग शाखेत नोंदणी, ५० शाखा वेबसाईट, नावनोंदणीसाठी -९२२६७६६१२९

■ जन्मकुंडली-हस्तरेषा-टॅरोकार्ड-अंकशास्त्र वास्तूशास्त्र, नवग्रह रत्ने या विषयी मार्गदर्शन वेलनेस ज्योतिषालय -९२२६७६६१२९

■ अलिबाग मधिल ऑफिस करिता एक्सपेरिएंस्ड ड्राफ्ट्समन,आर्किटेक्ट, इंटीरियर डिझायनर पाहिजे. मोबाईल नंबर ९९७०३९१६९७

■ मांडवा येथे गाडीवर ड्रायव्हर पाहिजे आहे.
मो. ८००७८९३२३२/९४२१९५४३४८

■ वाडगाव फाटा येथे कॉटेजमध्ये काम करण्यासाठी जोडपे पाहिजे. मो.९८२२९३८४४४

■ अलिबागमध्ये आर्किटेक्चरल फर्मकरीता ऑटोकॅड ड्रॉप्समन पाहिजेत. संपर्क- ९४२२०९४१५१, ९२७०८२७८२९.

■ Tally अकाऊंट कामाचा अनुभव असलेली लेडीज हवी आहे. ८००७८३३२३२ झिराड, पगार १८०००/२१०००

■ शॉप भाडेने देणे आहे. आत २००sq.ft. आणि बाहेर २०० sq.ft.R.C.F. कॉलनी समोर, साळवी ऑटोचे शेजारी, भाडे -१०,०००/- ८२०८३७२०३०, ७७५८००३४५६

■ रसिक हार्डवेअर अलिबाग ९४२२६९०८५४, दुकानात कामासाठी मुलगा पाहिजे.

■ Design Metrics is Hiring!
Need a gradute Architect or Intern at our Studio in Alibag. Skills required - Autocad, sketchup, Photoshop & ms office. Kindly Share your CV and Portfolio on **designmetricsoffice@gmail.com**
**Contact No - 9970051876**

**जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१**

# रेल्वे मार्ग ओलांडणाऱ्यांना समज



**। नेरळ । प्रतिनिधी ।**

**मध्य रेल्वेचे मेन लाईनवरील भिवपुरी रोड रेल्वे स्थानकात प्रवासी रूळ ओलांडून जात असल्याच्या घटना सातत्याने घडत आहेत. असे रूळ ओलांडून जाणाऱ्या अनेक प्रवाशांना आपले प्राण गमवावे लागले आहेत. त्यामुळे रेल्वे राखीव दलाकडून असा रूळ ओलांडून जाणाऱ्या प्रवाशांना एकत्र करून त्यांना समज देण्यात आली.**

मध्य रेल्वेच्या मेन लाईनवरील भिवपुरी रोड स्थानक येथे आजूबाजूला गावे आहेत आणि त्या ठिकाणी राहणारे प्रवासी हे रूळ ओलांडून आपल्या घरी जाण्याचा प्रयत्न करतात. मात्र, रूळ ओलांडून जाणाऱ्या अनेक प्रवाशांना यापूर्वी झालेले अपघात लक्षात घेऊन मध्य रेल्वेकडून भिवपुरी रोड रेल्वे स्थानकात कर्जतकडील भागात आणि मुंबईकडील भागासाठी लोखंडी बॅरिकेट्स उभारल्या गेल्या आहेत. तरीदेखील प्रवासी हे रुळावरून ये-जा करीत असतात. त्यामुळे नियम डावलून प्रवासी रूळ ओलांडून जात असल्याबद्दल अनेक तक्रारी या मध्य रेल्वेकडे करण्यात येत असतात.

त्यामुळे प्रवाशांच्या सुरक्षेसाठी कर्जत येथील रेल्वे राखीव दलाकडून भिवपुरी रोड रेल्वे स्थानकात कारवाई करण्यात आली. त्यावेळी उपनिरीक्षक प्रसाद चौगुले आणि स्थानक प्रबंधक शिवपुरी आहेर यांनी रूळ ओलांडून जाणाऱ्या प्रवासी यांना एकत्र करून त्यांना रूळ ओलांडून जाणे किती धोकादायक आहे, याबद्दल माहिती दिली. त्याचवेळी काही प्रवाशांवर करावाईदेखील करण्यात आली असून, उपनिरीक्षक प्रसाद चौगुले यांनी सर्व प्रवाशांना रेल्वे नियमदेखील सांगितले आणि पुन्हा रूळ ओलांडताना आढळून आल्यास त्यांच्या दंडात्मक आणि कायदेशीर कारवाई केली जाईल, असे निक्षून सांगितले आहे.

# ओवेपेठेत चोरांचा शिरकाव

## रहिवांशामध्ये घबराटीचे वातावरण

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पनवेल महानगरपालिका हद्दीत येणाऱ्या खारघरमध्ये ठिकठिकाणी मध्यरात्रीत घरफोडीचे किस्से समोर येत आहेत. त्यामुळे चोरट्यांनी खारघर पोलिसांसमोर आव्हान निर्माण केले आहे. खारघर परिसरात गेल्या काही दिवसांमध्ये सेक्टर १२, सेक्टर १० अशा ठिकाणी बंद घराची कुलूप तोडून चोरी झाली असतानाची बातमी ताजी असतानाच आणखी एक चोरांचा थरारमय सीसीटीव्ही फुटेज समोर आला आहे.

खारघर पोलीस स्टेशनच्या हद्दीत काही दिवसापासूनच चोरट्यांनी धुमाकूळ घातला आहे. काल रात्री दोन ते तीनच्या दरम्यान पेठगाव येथे पुन्हा एकदा घरफोडी करत चोरट्यांनी बंद घरांना आपल्या निशाण्यावर ठेवले आहे. चोरट्यांचा हा थरार सीसीटीव्हीत कैद झाला असल्याचे दिसत आहे. अमोल पाटील यांच्या इमारतीतील एका भाडेकरूच्या बंद घराचे कुलूप तोडून आठ ते नऊ हजार चोरी झाली असल्याची प्राथमिक माहिती मिळाली आहे. अजय शेळके यांची बंद घराचे कुलूप तोडले असून, झंकार ब्रास बँड ऑफिसचे कुलूप तोडले असल्याचे समोर आले आहे. चार ते पाच जणांच्या चोरांच्या टोळीमुळे नागरिक हवालदिल झाले आहेत. या चोरांचा बंदोबस्त करावा आणि त्यांना अटक करावी, अशी मागणी येथे रहिवासी करत आहेत.

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

१४ जुलै

१) श्री.अनिल नानू गुरव
अलिबाग, १४-७-१९५५

# कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे. जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क-** ८०५५३२५६७८ **(बीपीन राठवा)**
९२२६०५५१५५ **(अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**



**स्व. सौ. कलावती भवानजी देढीया, स्मरणार्थ महावीर ट्रेडर्स बाजार पेठ अलिबाग**



**स्व. श्री. लक्ष्मणजी गौरीसाजी अग्रवाल, स्मरणार्थ**

# आनंदीबाई खांडेकर यांचे निधन

**। कोलाड । वार्ताहर ।**



चिल्हे येथील आनंदीबाई दगडू खांडेकर यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. निधनसमयी त्या ८५ वर्षांच्या होत्या. त्यांच्या अंत्ययात्रेसाठी खांब पंचक्रोशीसह रोहा तालुक्यासह विविध भागातून विविध क्षेत्रातील बहुसंख्येने समाजबांधव उपस्थित होते. त्यांच्या पश्चात दोन मुले, तीन मुली, पुतणे, सुना, जावई, नातवंडे, पतवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांचे दशक्रिया विधी मंगळवारी (दि.१६) तर तेरावे उत्तरकार्य शुक्रवारी (दि.१९) राहत्या निवासस्थानी होणार आहेत.

# पनवेल उपजिल्हा रुग्णालयाचे श्रेणीवर्धन

**। पनवेल । विशेष प्रतिनिधी ।**

पनवेल उपजिल्हा रुग्णालयामध्ये आता शंभरऐवजी २०० खाटांची व्यवस्था असणार आहे. त्यामुळे रुग्णांना आवश्यक ती वैद्यकीय सुविधा मिळण्यास मदत होणार आहे. बुधवारी राज्य सरकारने अधिसूचना काढून हा निर्णय घेतलेला आहे. लवकरच याबाबत कार्यवाही होणे अपेक्षित आहे. बांधकाम व पदनिर्मितीबाबत स्वतंत्र कार्यवाही करण्यात येणार असल्याचे जाहीर केले आहे.

## शंभरऐवजी आता २०० खाटांची सुविधा

## बुधवारी राज्य सरकारची मंजुरी

पनवेल उपजिल्हा रुग्णालय हे पनवेल परिसरात एकमेव सरकारी हॉस्पिटल आहे. या ठिकाणी शेकडो रुग्ण येतात. या ठिकाणी वेगवेगळ्या आजारांवर उपचार केले जातात. त्याचबरोबर प्रसूतीगृहसुद्धा आहे. त्याचबरोबर सिटीस्कॅनची सोय या रुग्णालयामध्ये आहे. पनवेल महानगरपालिकेने हा भूखंड सार्वजनिक आरोग्य विभागाला दिला आहे. येथे सध्या शंभर खाटांची व्यवस्था असणारे रुग्णालय आहे. परंतु ही सुविधा अपुरी पडत असून, पनवेल परिसराचा झालेला विकास आणि वाढलेली लोकवस्ती पाहता, पनवेल उपजिल्हा रुग्णालय दोनशे कॉटमध्ये श्रेणीवर्धित करावे अशा प्रकारचा प्रस्ताव आरोग्य सेवा आयुक्तालयाने सादर केला होता.

त्यानुसार लवकरच पनवेल उपजिल्हा रुग्णालय २०० कॉटचे असेल असे सार्वजनिक आरोग्य विभागाने जाहीर केले आहे. अवर सचिव अ.भी. मोरे यांनी १० जुलै रोजी यासंदर्भात अधिसूचना जारी केली आहे.



# आपटवणे शाळेत साहित्य वाटप

**। पाली/बेणसे । प्रतिनिधी ।**

रायगड शैक्षणिक विकास विश्वस्त निधी या संस्थेने आपटवणे शाळेतील आदिवासी, गरीब, गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप केले. याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष बापूसाहेब नेणे व सदस्य युवराज महाजन, माजी प्राध्यापक पालीवाला कॉलेज तसेच सदस्या सागळे उपस्थित होत्या.

या संस्थेने शाळेतील आदिवासी गरीब गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप केले. यावेळी शाळेच्या मुख्याध्यापिका प्रमिला म्हात्रे यांनी उपस्थितांचे स्वागत केले. यावेळी विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. राजेंद्र पाटील यांनी सर्वांचे आभार मानले. यावेळी शाळेचे शिक्षक वृंद गणेश म्हात्रे, सीमा वैद्य व शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य उपस्थित होते.

# शेतकऱ्यांचा शेताच्या बांधावर सत्कार



**। रसायनी । वार्ताहर ।**

जगाचा पोशिंदा असलेल्या शेतकरी राजाचा दरवर्षी पावसाळ्यात शेतकऱ्यांच्या शेताच्या बांधावर जावून रायगड प्रेस क्लब संलग्न असलेल्या खालापूर प्रेस क्लब सत्कार समारंभ करीत असताना यावर्षीही खालापूर प्रेस क्लबच्या वतीने १२ जुलै रोजी खालापूर तालुक्यातील वयाल येथील शेतकरी शिवाजी ठाकूर तसेच परखंदे येथील महिला शेतकरी अर्पिता पाटील यांचा शेताच्या बांधावरती आदर्श शेतकरी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी भाई ओव्हाळ, प्रवीण जाधव, खालापूर प्रेस क्लब अध्यक्ष प्रशांत गोपाळे, कार्याध्यक्ष अनिल पाटील, सचिव रवींद्र मोरे, उपाध्यक्ष एस.टी. पाटील, ग्रामीण उपाध्यक्ष काशिनाथ जाधव, खजिनदार समाधान दिसले, सहखजिनदार संतोषी म्हात्रे, सहसचिव राज साळुंके, प्रसिद्धी प्रमुख नवज्योत पिंगळे आदींनी मेहनत घेतली.

## शिवाजी ठाकूर, अर्पिता पाटील यांचा गौरव

शेतकरी शिवाजी काथोर ठाकुर यांनी शेतीला जोडधंदा म्हणून मत्स्यव्यवसाय, कुक्कुट पालन, भाजीपाला पिकवणे, शेतात विविध प्रकारचे कडधान्ये व पाळीव पशुसाठी लागणारे अन्न हे शेतात पिकविले आणि वृक्षलागवड केली आहे. अर्पिता पाटील यांनी महिला असताना शेती टिकून ठेवली असून, दुग्धव्यवसाय, विविध प्रकारचे कडधान्ये, भाजीपाला लागवड, वृक्षलागवड, नाचनी, भेंडी, सूर्यफुल आदी उपक्रम शेतात राबविल्याने त्यांच्या या शेती व्यवसायातील उल्लेखनीय कामगिरीची दखल घेत खालापूर प्रेस क्लबने गौरव केला.

यावेळी टेंभरी सरपंच रमेश गायकवाड, उपसरपंच निखील पाटील, रोशन गायकवाड, महेंद्र मोरे, अपर्णा पवार,नितीन महाडिक, सुमित भगत, रवींद्र देशमुख, होराले सरपंच नीलम भूईकोट, उपसरपंच नागेश पाटील, शंकर मानकवले, ललिता जाधव, सुरेखा दळवी, वैशाली खराडे, अविराज बुरूमकर, बाबू पोटे, हनुमत मोरे, अर्जुन कदम, संतोष शेवाळे आदी प्रमुखांसह शेतकरी उपस्थित होते.

# टेंभरीच्या उपसरपंचपदी निखिल पाटील

**। रसायनी । वार्ताहर ।**


चौक विभागातील ग्रुप ग्रामपंचायत टेंभरीच्या उपसरपंचपदी उध्दव शिवसेनेचे निखिल पाटील यांची बिनविरोध निवड झाली. उपसरपंचपदासाठी महाविकास आघाडीकडून निखिल पाटील यांचा एकमेव अर्ज आल्याने निवडणूक अधिकाऱ्यांनी टेंभरी ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी निखिल पाटील यांची निवड झाल्याचे जाहीर केले. यावेळी राजिप सदस्य मोतीराम ठोंबरे, शिवसेना रायगड जिल्हाप्रमुख तथा माजी आमदार मनोहर भोईर यांचे स्वीय सहाय्यक सौरभ भडसावळे यांनी निखिल पाटील यांना शुभेच्छा दिल्या. त्यांच्यासोबत चौकचे माजी उपसरपंच राजन गावडे, अजिंक्य देशमुख आणि विकास गावडे आदी उपस्थित होते.



# साप्ताहिक राशिभविष्य दि. १४ ते २० जुलै २०२४


**ज्योतिषी : मिलिंद पाटील, सारळ-अलिबाग**
**मोबा.९४०४७९१७९८**

## मनाप्रमाणे गोष्टी घडण्याची शक्यता



**मेष :** मेषराशीधारकांना या सप्ताहात आपण आपल्या प्रकृतीबाबत अधिक जागृत राहावे. विशेषतः कफ, उष्णतेचे विकार, खाण्यापिण्याचा हलगर्जी पणा करू नका जे जमते तेच करा. वाद-विवाद कटाक्षाने टाळा. बोलण्यावर योग्य नियंत्रण ठेवा. दररोजचा व्यायाम व योगाचा अवलंब करा निराशेचे सावट दूर करून आपल्या ध्येयासाठी प्रयत्न करा. तडजोडीचे धोरण स्वीकारणे हितकारक ठरेल. आवश्यक कामाचा पाठपुरावा करणे महत्त्वाचे ठरू शकते. प्रयत्नाने बऱ्याच गोष्टी साध्य करू शकाल. प्रकृतीच्या बाबत अधिक जागरूक राहा. खाण्यापिण्याची पथ्ये पाळा. उष्णतेच्या विकारांपासून सावध राहा. कामाचा व्याप वाढणार आहे. मन स्थिर ठेवण्याचा प्रयत्न करा. आपल्या कामाकडे जास्त लक्ष दिल्यास तुमच्या मनाप्रमाणे गोष्टी घडण्याची शक्यता आहे. विद्यार्थीवर्गाने अभ्यासाबाबत दुर्लक्ष करू नको **महिलांना-** नको त्या अपेक्षा ठेऊ नका आपले काम भले आपण भले हे धोरण ठेवा, घरगुती वादाचे प्रसंग कटाक्षाने टाळा. सामंजस्याने परिस्थिती हाताळा. आर्थिक बाजू ठीक राहील. **शुभ दिनांक-** १४,१५

## मान सन्मान होण्याची शक्यता



**वृषभ :** वृषभराशीसाठी या सप्ताहातील ग्रहमान पाहता आपण थोरामोठ्यांच्या विचारांचे स्मरण करा. खर्चाचे प्रमाण वाढणार असल्याने प्रथमपासून अनावश्यक खर्च टाळावा. साहसीवृत्ती कटाक्षाने टाळा. नोकरादारांना दिलासा मिळेल. बौद्धिकक्षेत्राला वाव मिळेल. आपली बलस्थाने कोणती याचा मागोवा घ्या, म्हणजे त्यांचा भावी काळासाठी उपयोग करता येईल. या आठवड्यात आपली आर्थिक बाजू सावरता येईल. काही जुनी वसूली होण्याची शक्यता. नोकरदारांना मोठा दिलासा मिळेल. कामकाजात घरुनच व्यस्त राहाल. आपल्या हट्टी स्वभावाला मुरड घालण्याचा प्रयत्न करा. आर्थिक गुंतवणूक करताना तज्ज्ञांचा सल्ला घेणे हितकारक ठरेल. आपल्या नावाचा विचार मान सन्मानसाठी होणार आहे, विद्यार्थीवर्गाला चांगली संधी मिळेल. आपल्या बोलण्यावर योग्य नियंत्रण ठेवल्यास आपल्याबद्दल गैरसमज होण्याचे प्रसंग टाळू शकाल. **महिलावर्ग-** आर्थिक व्यवहारात सावधानता बाळगा. थोरामोठ्यांच्या संपर्कात राहाल. आर्थिक बाजू ठीक राहील. सरकारी नियमांचे पालन करा. प्रकृतीस्वास्थ्य जपा उद्योग-व्यवसायात प्रगती कराल. मुलांकडे अधिक लक्ष द्या **शुभ दिनांक-** १६,१७

## काम करताना जागरूक राहा




**मिथुन :** मिथुनराशीसाठी या आठवड्याचे ग्रहमान पाहता आपण मुलांशी सामंजस्याने वागणे हितकारक ठरू शकेल. चिकाटीने आपण आपले काम पूर्ण करू शकाल. नोकरदारांनी वरिष्ठांशी मित्रत्व राखावे. नको त्या प्रलोभनात अडकू नका. कौटुंबिक वातावरण बिघडणार नाही याची खबरदारी घ्या. मुलांनी अभ्यासाकडे अधिक लक्ष द्यावे. वादाचे प्रसंग कटाक्षाने टाळावेत. आपल्या कामाबाबत अथवा महत्त्वाच्या गोष्टींची गुप्तता पाळल्यास हा आठवडा चांगला जाईल. मालमत्तेसंबंधी वादाचे प्रसंग उद्भवण्याची शक्यता आहे, तेव्हा ते सामंजस्याने सोडवा. आप्तेष्टांशी चांगले संबंध राहतील. आपण जोडीदाराच्या दैनंदिन समस्या सोडविण्याचा प्रयत्न करा. इतरांना मदत करण्यात पुढाकार घ्या. घरून काम करताना जागरूक राहा. साथीदाराशी प्रेमसंबंधांने वागणे हितकारक राहील. त्यांच्या मनाचा विचार करून वागा. **महिलांना-** आपल्या कलाक्षेत्राला चांगला प्रतिसाद मिळेल व सामाजिक क्षेत्रात आपली वाहवा मिळवाल. आपल्या बोलण्यावर मात्र योग्य नियंत्रण ठेवा, त्यामुळे गैरसमज वाढणार नाही. शेतीविषयक व स्थावरजंगमबाबतची कामे मार्गी लागतील. **शुभ दिनांक -** १८,१९

## नव्या ओळखींचा लाभ होईल




**कर्क :** या सप्ताहात कर्कराशीधारकास आपण आपल्या प्रकृतीबाबत अधिक काळजी घेणे आवश्यक आहे. विशेषतः नियमित आहार, व्यायाम, योगाचा अवलंब करा. संघर्षाचे प्रसंग कटाक्षाने टाळा. मेहनतीला पर्याय नाही. नको त्या प्रलोभनात अडकू नका. वैवाहिक जोडीदाराची साथ मिळू शकेल. कुटुंबासाठी व मुलांसाठी अधिक वेळ देऊन त्यांची काळजी घ्यावी. आपल्या प्रकृतीकडे दुर्लक्ष करू नका. नियमित व्यायाम, खाण्यापिण्याची पथ्ये पाळा. विशेषतः उष्णतेच्या विकारापासून सावध राहा. आपली मानसिकता बिघडणार नाही याची दक्षता घ्या. घरगुती वादविवादाचे प्रसंग कटाक्षाने टाळा. सर्वांशी जुळवून घ्या. आर्थिक बाजू लक्षात घेऊन हिशोबी राहण्याचा प्रयत्न करा. जागेसंबंधी वादाचे प्रसंग उद्भवणार नाहीत याची दक्षता घ्या. आदरयुक्त वागणे कायम ठेवल्यास त्याचा उयोग होईल. नव्या ओळखींचा लाभ घेता येईल. नोकरदारांना मोठा दिलासा मिळेल. **महिलाना-** कलाक्षेत्राला प्रोत्साहन मिळेल, एखादी नवी ऑफर मिळेल कौटुंबिक गोष्टींना प्राधान्य द्या. घरात धुसपूस होईल. **शुभ दिनांक-** १६,२०

## विरोधकांवर अंकुश ठेवता येईल



**सिंह :** सिंहराशीसाठी या सप्ताहात मिळणारा फुरसतीचा वेळ आपण निःस्वार्थी कामासाठी दिल्यास आपणास कृतकृत्य झाल्याचे समाधान मिळू शकेल. एखाद्या महत्त्वाच्या व्यक्तीची भेट होण्याची शक्यता आहे. आपण इतरांना ऊर्जा देण्याचा प्रयत्न करा. आर्थिक बाजू ठीक राहील. बौद्धिक क्षेत्राला वाव मिळेल. प्रकृती जपा. कोणताही निर्णय घेताना अतिशय विचारपूर्वक घ्या. नोकरदारांना चांगला दिलासा मिळेल. कलाक्षेत्राला उत्तम प्रोत्साहन मिळेल. महिलांच्या अंगभूत कलागुणांना चांगले प्रोत्साहन मिळेल. आर्थिक गुंतवणूक करण्याआधी तज्ज्ञांचे मार्गदर्शन घेणे हितकारक ठरेल. ओळखीचा लाभ घेता येईल. बोलण्यावर योग्य नियंत्रण ठेवावा. आपल्यावरील जबाबदाऱ्या पूर्ण करण्याचा प्रयत्न केल्यास मोठा लाभ होईल. विरोधकांबाबत चिंता करू नका, त्यांच्यावर अंकुश ठेवता येईल. नोकरदारांनी वरिष्ठांशी मिळतेजुळते घेण्याचे धोरण स्वीकारणे हितकारक ठरेल. **महिलांना-** महिलांना घरबसल्या हा काळ उत्तम असून त्यांच्या कलागुणांना वाव मिळेल. कलेत मन रामवाल. घरात पाहुणे येतील **शुभदिनांक-** १७,१९

## रागावर योग्य नियंत्रण ठेवा



**कन्या :** कन्याराशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता आपल्या भविष्याचा विचार करण्यापेक्षा वर्तमानकाळातील गोष्टींसाठी त्याचा योग्य विचार करून वागणे अधिक ठीक राहील. नोकरदारांना दिलासा मिळेल, मात्र सरकारी नियम व कायदा यांचे कटाक्षाने पालन करा. सर्व बाबतीत प्रयत्नशील राहणे मात्र आवश्यक आहे. ज्या गोष्टी आपण बदलू शकत नाही, त्या स्वीकारण्याचे धोरण स्वीकारल्यास हितकारक ठरू शकेल. आपल्या बोलण्यावर योग्य नियंत्रण ठेवणे आवश्यक ठरेल. त्यामुळे इतरांशी नाराजी आपण टाळू शकाल. प्रकृतीबाबत अधिक दक्ष राहा, आपण आपल्या कार्यातील कामे कशी पार पाडता येतील याबाबत अधिक लक्ष द्याल व ती पार पाडण्याचा प्रयत्न कराल. वेळोवेळी ज्येष्ठांशी अथवा जाणकारांशी चर्चा करून प्रश्न सोडविता येतील. कामाचा उत्साह वाढीला लागेल. आप्तेष्टांच्या संपर्कात राहाल. आपण आपल्या रागावर योग्य नियंत्रण ठेवा **महिलांना-**अनावश्यक खर्च टाळा. घरगुती वातावरण चांगले ठेवता येईल. आपल्या विकासाची एखादी योजना आखणे आवश्यक आहे. धार्मिक कार्यात अधिक रस घ्याल. **शुभदिनांक**-१५,२०

## ध्येयाजवळ जाऊ शकाल




**तुळ :** तुळ राशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता विशेषतः नोकरदारांना मोठा दिलासा मिळू शकेल. आपला ताण उतरणार आहे, आपल्या कामाचे कौतुक केले जाईल, पण अहंकारापासून दूर राहणेच योग्य ठरेल. आपली मते दुसऱ्यांवर लादू नका. आर्थिक बाजू चांगली ठेवता येईल, खिशात पैसा खेळेल, पण पर्यायाने खर्चाचे प्रमाणही वाढण्याची शक्यता आहे. स्वतःमधील ऊर्जा पाहा व त्याप्रमाणे काम करणे ठीक राहील. कौटुंबिक वातावरण वादासारख्या प्रसंगांनी बिघडणार नाहीत याची दक्षता घ्या. प्रकृतीची पथ्ये पाळा, विशेषतः खाण्यापिण्याची पथ्ये पाळा. मित्रांची पारख करून त्यांची मैत्री ठेवा. आपण आपल्या कार्यक्षेत्रातील कामासंबंधी प्रयत्नशील राहिल्यास आपल्या ध्येयाजवळ जाऊ शकाल. व्यावसायिक क्षेत्रात मात्र तज्ज्ञांच्या सल्ल्याशिवाय आर्थिक व्यवहार करू नये. हाती घेतलेल्या कार्यात यशाची अपेक्षा ठेवू शकता. कलाक्षेत्राला चांगले प्रोत्साहन मिळेल, **महिलांना-** बेजबाबदारपणे कोणतेही कृत्य करू नका, धोका आहे. इतरांमधील दोष काढण्याचे कटाक्षाने टाळावे. आपल्या भावनांना आवर घालून जबाबदारपणे वागण्याचा प्रयत्न कराव. **शुभदिनांक-** १४,१९

## तुम्हाला शांती प्राप्त होईल




**वृश्चिक :** वृश्चिकराशीसाठी या सप्ताहात तुमच्या वैवाहिक आयुष्यात अलीकडे फार मजा राहिलेली नाही; तुमच्या जोडीदाराशी बोला आणि काहीतरी कूल प्लॅन करा. तुम्हाला आपल्या जीवनात कुठल्या खास व्यक्तीची कमतरता वाटू शकते. अत्यंत व्यस्त वेळापत्रकातदेखील आपले आरोग्य चांगले असेल. कुटुंबातील सदस्यांना आपल्या जीवनात विशेष स्थान असेल. जर तुम्हाला वाटत असेल की, तुमचा लवमेट तुमच्या गोष्टींना समजू शकत नाही तर, त्यांच्या सोबत वेळ घालावा आणि आपल्या गोष्टींना स्पष्टपणे त्यांच्या समोर मांडा. तुम्ही सर्व नातेवाईकांपासून दूर होऊन आपल्या दिवसाला अश्या जागेत घालवणे पसंत कराल जिथे जाऊन तुम्हाला शांती प्राप्त होऊ शकेल. वैवाहिक आयुष्यात एक छान डिनर आणि मस्त झोप मिळणार आहे. तुमचे वडील, जेस्ट आज तुमच्यासाठी काही भेट आणू शकतात. **महिलांना-** प्रकृतीच्याबाबत चालढकलपणा करू नका अनावश्यक खर्च टाळावा. आर्थिक बाबतीत तज्ज्ञांच्या सल्ल्यानेच व्यवहार करावेत. जेणेकरून ज्याचा योग्य परतावा आपणास मिळू शकेल. नाही **शुभदिनांक-** १६,१८

## घरगुती तणाव सुकर होतील



**धनु :** धनुराशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता पोस्टाने आलेले पत्र संपूर्ण कुटुंबासाठी आनंददायी बातमी घेऊन येईल. तुमच्या जोडीदाराच्या कुटुंबातील सदस्यांच्या हस्तक्षेपामुळे तुमचा कालावधी अस्वस्थतेत जाईल. व्यस्त दिनचर्येचा व्यतिरिक्त तुम्ही आपल्यासाठी वेळ काढण्यात सक्षम व्हाल. रिकाम्या वेळात काही रचनात्मक कार्य करू शकतात. तुमचे वैवाहिक आयुष्य चुकीच्या पद्धतीने तुमचे शेजारी तुमचे कुटुंबिय आणि नातेवाईकांपर्यंत पोहोचवतील. घरात तुमच्या चांगल्या गुणांची चर्चा होऊ शकते. तूमचा विश्वास आणि ऊर्जाशक्ती आज उच्च असेल. तुम्ही विना कुणाच्या मदतीने तुम्ही धन कमावण्यात यशस्वी व्हाल. तुमची अतिरिक्त ऊर्जा आणि प्रचंड उत्साह तुम्हाला सुयोग्य ठरतील असे निर्णय मिळतील आणि घरगुती तणाव सुकर करील. प्रेमामधील तुमच्या असभ्य वर्तणुकीची माफी मागा. तुम्ही आपल्या जीवनसाथीला सरप्राईझ देऊ शकतात. आपल्या सर्व कामांना सोडून तुम्ही त्यांच्या सोबत वेळ घालवू शकतात. **महिलांना-** माणूस पारखण्याचे सूत्र पाळल्यास पश्चात्ताप करण्याची वेळ येणार नाही. व्यवसायातील मतभेद टाळण्याचा प्रयत्नकरा. बौद्धिकक्षेत्राला वाव मिळेल. **शुभदिनांक-** १८,२०.

## धन व्यर्थ खर्च होईल



**मकर :** मकरराशीसाठी या सप्ताहातील ग्रहमान पाहता तुम्ही मित्रांची साथसंगत गमावलीत तर तुमच्या हास्याला अर्थ नाही. तुमच्या हसण्याचा आवाज कुणी ऐकू शकणार नाही - तुमचे हृदय ठकठक करणार नाही. जे लोक बऱ्याच दिवसापासून खूप व्यस्त होते त्यांना स्वतःसाठी वेळ मिळू शकतो. तुमचं तुमच्या जोडीदाराशी एखाद्या जुन्या कारणावरून भांडण होईल, उदा. तो/ती तुमचा वाढदिवस विसरणे इत्यादी. पण साप्ताहाच्या शेवटी सगळं काही व्यवस्थित होईल. कुठून तरी उधार परत मिळू शकते ज्यामुळे तुमच्या काही आर्थिक समस्या दूर होतील. हमीपेक्षा आज तुमची ऊर्जा कमी आहे असे तुम्हाला जाणवेल. म्हणून अतिरिक्त कामाचा बोजा घेऊ नका. थोडी विश्रांती घ्या आणि भेटीगाठींच्या वेळा पुढे ढकला. चंद्राच्या स्थितीमुळे तुमचे धन व्यर्थ खर्च होऊ शकते. जर तुम्हाला धन संचय करायचे आहे तर, तुम्ही आपल्या जीवनसाथी किंवा माता-पिताच्या सोबत या बाबतीत बोलू शकतात. **महिलांना-** प्रकृतीबाबत, विशेषतः उष्णतेच्या विकारांबाबत सावध राहा. आरोग्याचा त्रास होऊ शकतो. वेळेवर जेवण घ्या, नातलगांकडून चांगली बातमी मिळेल, **शुभदिनांक-** १५,१७

## धन लाभ होण्याची पूर्ण शक्यता



**कुंभ :** कुंभराशी या सप्ताहात आपण घरगुती प्रश्न आणि प्रलंबित घरगुती कामं पूर्ण करण्यासाठी लाभदायक कालावधी आहे. प्रेमाचा प्रवास मधुर पण क्षणकाल टिकणारा असेल. परिस्थितीपासून तुम्ही दूर पळून जाऊ लागलात, तर येनकेनप्रकारे ती तुम्हाला खिंडीत पकडेल आणि तिचा सामना हा करावाच लागेल. तुमच्या इतर कुटुंबियांमुळे तुमच्या वैवाहिक आयुष्यावर नकारात्मक परिणाम होईल, पण तुम्ही दोघेही ही परिस्थिती चांगल्या प्रकारे हाताळाल. तुम्ही ऑफिसच्या कामांना इतके लवकर पूर्ण कराल की, तुमचे सहकर्मी तुम्हाला पाहत राहतील. मित्रांचा आधार लाभेल आणि ते तुम्हाला आनंदी ठेवतील. तुमच्या नशिबाने या साप्ताहात तुम्हाला धन लाभ होण्याची पूर्ण शक्यता आहे. तुमचे मामा किंवा आजोबा तुमची आर्थिक मदत करण्याची शक्यता आहे. तुमच्या जंगी पार्टीत सर्वांना सामावून घ्या. तुम्ही असा एखादा मोठा इव्हेंट आयोजित करू शकता. इतकी उर्जा तुमच्याकडे येणार आहे. **महिलांना-** विशेषतः महिलावर्गाला त्यांच्या अंगभूत कलागुणांना उत्तम संधी मिळेल. प्रवास योग संभवतात. प्रकृतीबाबत जागरूक राहा, योगाचा अवलंब करा. **शुभदिनांक-** १६,१७

## इतरांचे लक्ष वेधून घ्याल



**मीन :** हा साप्ताहात मीनराशीसाठी या सप्ताहातील ग्रहमान पाहता कुटुंबात वैद्यकीय खर्च निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. जर तुमच्या पैशा संबंधित काही गोष्ट कोर्ट-कचेरीत आडकलेली असेल तर या सप्ताहात त्यात तुम्हाला विजय मिळू शकतो आणि तुम्हाला धनलाभ ही होऊ शकतो. घरगुती प्रश्न आणि प्रलंबित घरगुती कामं पूर्ण करण्यासाठी लाभदायक कालावधी आहे. तुमच्या प्रेमभऱ्या स्मिताने प्रियजनांचा दिवस उजळून टाका. कामामध्ये स्वतःसाठी वेळ काढणे खूप कठीण असते. परंतु, हा कालावधी असा आहे जिथे तुमच्या जवळ आपल्यासाठी भरपूर वेळ असेल. विवाहाचा परमोच्च आनंदाचा क्षण तुम्ही अनुभवू शकाल. मात्र काहीवेळा लोकांमध्ये असतानाही तुम्हाला एकटे वाटेल. तुमच्या आकर्षक मनमोहक वागणुकीमुळे इतरांचे लक्ष वेधून घ्याल. आठवड्याच्या शेवटी अनपेक्षितरित्या तुमच्या खर्चात वाढ झाल्याने तुमची मन:शांती ढळेल. **महिलांना-** कोणाशीही नाराजी पत्करू नका. प्रकृतीस्वास्थ्य जपा, विशेषतः खाण्यापिण्याची पथ्ये पाळा. घरगुती वातावरण चांगले ठेवण्याचा प्रयत्न करा. कलाक्षेत्राला एखादे बक्षीस आपल्याला मिळेल **शुभदिनांक-** १७,२०.

# राजकारण राष्ट्रविकासासाठी करायला हवे!

**विरोधकांना सुद्धा संख्याबळ मिळाले आहे आणि विचारबळ आहे यातून त्यांनी उद्या भाजप आणीबाणी सदृश्य वर्तवणूक करीत होते हे सिद्ध केले तर? नोटाबंदी असेल, न्यायव्यवस्था असेल, निवडणूक आयोग असेल, अनेक राज्यात राज्यपाल राजवट निर्माण करण्यास मान्यता असेल असे अनेक विषय विरोधक मांडू शकतील. जनतेच्या पुढ्यात वारंवार विषय मांडल्यानंतर भाजपाला दुष्परिणाम भोगावेच लागतील.**



मोहोर



आचार-विचार
डॉ. विलास पवार

सत्ताधारी भाजपाप्रणित सरकारचा कारभार सुरु झाला. लोकसभेचे अधिवेशन सुद्धा सुरू आहे. या लोकसभा अधिवेशनात आणि गेल्या दहा वर्षात झालेल्या लोकसभा अधिवेशनात लक्षात येण्यासारखा फरक म्हणजे विरोधकांचे संख्याबळ आणि भाजपाला स्वकेंद्रीत सत्ताबळ न मिळण्यासाठी अस्तित्वात असलेले, संख्याबळ, अनेक पक्षांचे पाठिंबा आणि त्यांची राजकीय विचारप्रणालीशी तडजोड करण्याचे धोरण भाजपाने अतिशिघ्रतेने घेतल्यामुळे भाजपाने राजकीय फायदा निश्चितच करुन घेतला आहे. एकंदरीत लोकसभा निवडणूक झाल्यानंतरचे हे पहिलेच अधिवेशन आहे. भाजपाने पुन्हा एकदा ओमप्रकाश बिर्ला यांना लोकसभा अध्यक्षपदी विराजमान करुन भाजपाचा अजेंडा स्थिर केला. एखाद्या व्यक्तीची दुसऱ्यांदा नियुक्ती त्याच पदावर न करण्याचा मोदींच्या कार्यपद्धतीचे वैशिष्ट्ये राहिली आहे. सुमित्रा महाजनांना पुन्हा लोकसभाध्यक्ष बनण्याची संधी तर दूर त्यांना पुन्हा उमेदवारी सुद्धा दिली नाही. खरं तरं सरकार स्थिर असल्याची शंका कोठेतरी आहे म्हणून अन्य कोणालाही लोकसभाध्यक्ष न करता ओमप्रकाश बिर्ला यांनाच अध्यक्षपदाचा मान पुन्हा मिळाला. ओमप्रकाश बिर्ला यांनी भाजपा प्रति कृतज्ञ असल्याचा पुरावा सर्व देशाला दिला. अध्यक्ष म्हणून पदग्रहण करताना पंतप्रधान आणि विरोधीपक्ष नेत्यांनी अध्यक्षांना आसनावर बसवल्याचा एक रिवाज, परंपरा आहे. लोकशाहीचे ते द्योतक आहे. परंतु या घटनेबाबत विरोधीपक्ष नेते राहुल गांधी यांनी आक्षेप घेतली की बिर्ला यांनी लोकसभाध्यक्ष असताना मान झुकवून मोदींना नमस्कार करायला नको होता कारण लोकसभेत लोकसभाध्यक्ष हे सर्वश्रेष्ठपद आहे. ओमप्रकाश बिर्ला यांनी आपल्या पक्षाच्या सर्वोच्च नेत्याबाबत कृतज्ञता सवयीप्रमाणे व्यक्त केली यांत खरंतर राहुल गांधीनी आक्षेप घेतला नसता तरी चालला असता.राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकार असे भाजपाचे नेते मंडळी सरकारचा उल्लेख करू लागले आहेत. मोदी सरकार वगैरे उल्लेख आता होत नाही. परंतु खातेवाटपांवर सगळ्या पद्धतीची खाती आपल्या हातातच ठेवण्याचे यश मात्र भाजपाने मिळविले आहे. सरकारच्या स्थैर्याला आयत्यावेळी धक्का नको म्हणून लोकसभाध्यक्षपद मिळविण्यात सुद्धा भाजपाने यश मिळविले आहे. संविधान बदलण्याचा भाजपाचा इरादा आहे असे सर्व थरांत काँग्रेसने प्रचार केला आणि भाजपाला त्याचा धक्का बसला हे निवडणुकीच्या निकालाने निश्चित झाले. याचा परिणाम भाजपाने आणिबाणीचा निषेध करण्याचा प्रस्ताव आणून दिला. एका प्रकारे काँग्रेसला याबाबत खलनायकत्व बहाल करण्याचा भाजपाचा प्रयत्न केला गेला अशी मतमतांतरे विरोधकात मांडली जात आहेत. ओमप्रकाश बिर्ला यांनी आणीबाणीचा प्रस्ताव आणून आपली निवड भाजपाला उपयुक्त आहे. याचा पुरावाच दिला आहे. आता १८व्या लोकसभेत आणीबाणीचा प्रस्ताव आणला गेला आहे.परंतु १७ व्या लोकसभेत बिर्लांनी बिनदिक्कतपणे भाजपाच्या धोरणांना राबविले आहे. खासदारांचे निलंबन केले आहे. विरोधकांचे माईक बंद केले असे सुद्धा त्यांच्यावर आरोप केले गेले आहेत. बिर्लांनी स्वतः आक्रमकता दाखवली आहे. लोकशाही मार्ग की स्वपक्षाशी प्रामाणिकपणा यापैकी स्वपक्षाला मानणारे आहेत. त्यांचा पक्षाने योग्य आदर राखलाच पाहिजे. पण परंतु आणीबाणीचा निषेध करण्याचा प्रस्ताव खरंच या लोकसभेत मांडणे गरजेचे होते? महामारी राष्ट्रपतींनी आपल्या अभिभाषणात आणीबाणीबाबत वक्तव्य केले आहे. यातून या विषयाचे महत्व अधोरेखित होते. खरं तर आणीबाणी लोकशाहीच्या दृष्टीने भारतातच आहे. त्याचा निषेध होणे गरजेचे होते आणि त्या आणीबाणीचा निषेध तत्कालीन झालाच ना! मतदारांनी मतपेटीतून उत्तर दिले आणि इंदिरा गांधीना त्यांचा पक्षाचा पराभव पत्करावा लागला. जनता पक्षाचे सरकार अस्तित्वात आले पण अडीच वर्षानंतर जनतेने पुन्हा इंदिरा गांधीना निवडून दिले. आणीबाणीच्या अत्याचारांबाबत इंदिरा गांधीनी जाहीर सभेत माफी मागितली असल्याचे उल्लेख सुद्धा आहेत. मुळात माफी मागितल्याने अत्याचार केल्याचे पाप धुतले जात नाही हे खरे आहे. पण हे सुद्धा खरंच आहे की आणीबाणीचा हा कोळसा आता उगाळून राजकीय कुरघोडी करण्याची गरज नाही, नव्हती. आता विरोधकांना सुद्धा संख्याबळ मिळाले आहे आणि विचारबळ आहे यातून त्यांनी उद्या भाजप आणीबाणी सदृश्य वर्तवणूक करीत होते हे सिद्ध केले तर? नोटाबंदी असेल, न्यायव्यवस्था असेल, निवडणूक आयोग असेल, अनेक राज्यात राज्यपाल राजवट निर्माण करण्यास मान्यता असेल असे अनेक विषय विरोधक मांडू शकतील. जनतेच्या पुढ्यात वारंवार विषय मांडल्यानंतर भाजपाला दुष्परिणाम भोगावेच लागतील. फक्त भाजपाला विरोध करुन विरोधी पक्ष राष्ट्र उभारणीला विरोध तर करत नाही याचे भान सुद्धा विरोधी पक्षाला ठेवायला हवे. आज देशात कुरघोडीच्या राजकारणांपेक्षा जास्त महत्वाचे प्रश्न आहेत त्या प्रश्नांना विरोधी पक्षांनी मांडायला हवे आहे. आणि भाजपा आणि प्रणित सरकारने त्यासाठी चर्चा लोकसभेत घडवून आणायला हवी. खासदारांनी आपल्या राज्याचे प्रश्न केंद्र सरकारच्या पुढे मांडायला हवे. राजकारण हे निवडणुकीपुरते असायला हवे. खासदार हा लोकशाहीला बळकटी आणणारा महत्वपूर्ण व्यक्ती आहे. सर्वसामान्य जनतेला लोकसभेत प्रतिनिधीत्व करणारा व्यक्ती आहे. या सर्वांचे भान आता भाजप-ासहीत सर्व घटक पक्षांना, विरोधी पक्षांना येणे महत्वाचे आहे. सर्वांनी मिळून राजकारण केले तर राष्ट्र विकासासाठी करायला हवे.आज देशात युवकांचे प्रश्न, बेरोजगारी हे ज्वलंत प्रश्न आहेत. शेतकऱ्यांच्या प्रश्नाला तर मर्यादाच राहली नाही. शेतीविम्याच्या प्रश्नाबाबत तोडगा काढण्याचा अधिकार राज्यांना नाही. त्याचा पाठपुरावा केंद्रातच करावा लागणार आहे. प्रत्येक राज्यातल्या खासदारांनी आपल्या आचार विचारात समृद्धी आणून शेतकऱ्यांचे प्रश्न, राजकारण केंद्रीत न करता शेतकरी केंद्रीत करायला हवे. शेतकऱ्याला केवळ अन्नदाता म्हणून गोंडस नावाने बोलावण्यापेक्षा, शेतकऱ्यांचा पुळका आणण्याचा आभास निर्माण करण्यापेक्षा प्रत्यक्षात लोकसभेत युवकांच्या प्रश्नांची आणि शेतकऱ्यांसाठी उपाययोजनांची निर्मिती सहज पद्धतीने करायला हवी. एवढे केले तरी द्वेषमुक्त राजकारणाचा आधार न घेता निवडणुकांमध्ये राजकीय निवडणुकीत यश मिळविता येईल. **

---

# 'भानशेरा', 'वायल' आणि 'उतव' स्वयंपाकघरातले ऐवज

> **भानशेरा चुलीच्या पाटणाशेजारीच पडून असतो. त्याला आंघोळ सणासुदीचा कोणी घातली तर नाहीतर त्या भानशेराची कधीच काहीही तक्रार नसते. थंडीच्या दिवसात मांजर नाही तर बोका भानशेऱ्यामध्ये स्वतः ला गुंडाळून घेऊन थंडीपासुन आपला बचाव करत असतात.नव्वदीच्या दशकात भानशेरा आपलं स्थान टिकवून होता. गॅस आल्यानंतरही काही वर्षे बिनदिक्कतपणे भानशेरा स्वयंपाकघरात वावरत असायचे पण नंतर आधुनिकतेचे वारे भिनू लागले. मग शेगडीवरची भांडी उतरविण्यासाठी स्टील, ॲल्युमिनियम सारख्या धातूचे चिमटे, पक्कड वापरात आले पण तरीही आजतागायत मोठमोठ्या समारंभात भानशेरा अतिशय दिमाखदारपणे वावरताना दिसतो. आता छोट्यामोठ्या घरात भानशेरा दिसत नाही.**



कोकणस्पंदन
धनंजय शेट्ये

पूर्वी 'भानशेरा' प्रत्येक घराच्या चुलीच्या पाटणावर असायचे. गरमागरम सोरकूला टोप, पातेले, रणरणत्या चुलीवरुन खाली उतरायचे असलं की मग काळवंडलेल्या भानशेऱ्याचीच गरज भासते. भाजणारा हात वाचवण्यात 'भानशेरा' खूप महत्त्वाचे काम करीत असायचे.

फाटक्या कॉटनच्या साडीचे कापड जुने झाले की मग त्याच्या तुकड्याचा उपयोग भानशेरा म्हणून केला जात असे. 'भानशेरा' स्वतः सगळे सहन करते पण जेवण बनविणाऱ्याच्या हाताला कधीच दाह, झळ, धग पोहचू देत नाही. 'भानशेरा' बिचारे खूपच गरीब असते. दिसायला मळलेले असते. कितीही गरम भांडे असले तरीही ते गरम भांडे हातात पकडण्यासाठीची हिंमत ते काळवंडलेले भानशेराच देत असते. पण भानशेरा म्हणजे आपण खुप तुच्छच समजत असतो म्हणून भानशऱ्याच्या मळलेल्या रुपावर जावून चालत नाही. त्याचे गुण महत्त्वाचे असतात.

भानशेरा चुलीच्या पाटणाशेजारीच पडून असतो. त्याला आंघोळ सणासुदीचा कोणी घातली तर नाहीतर त्या भानशेराची कधीच काहीही तक्रार नसते. थंडीच्या दिवसात मांजर नाही तर बोका भानशेऱ्यामध्ये स्वतः ला गुंडाळून घेऊन थंडीपासुन आपला बचाव करत असतात.नव्वदीच्या दशकात भानशेरा आपलं स्थान टिकवून होता. भानशेरा जेवण्याच्या पंगतीला नेहमीच येत असे पण स्वतः निस्वार्थी!घरची माणसं जेवण पूर्ण करीत पर्यंत गरमागरम आमटीच्या नाहीतर गरमागरम भाजीच्या पातेल्याच्या बाजूला चिकटून बसून असायचे. गॅस आल्यानंतरही काही वर्षे बिनदिक्कतपणे भानशेरा स्वयंपाकघरात वावरत असायचे पण नंतर आधुनिकतेचे वारे भिनू लागले. मग शेगडीवरची भांडी उतरविण्यासाठी स्टील, ॲल्युमिनियम सारख्या धातूचे चिमटे, पक्कड वापरात आले पण तरीही आजतागायत मोठमोठ्या समारंभात भानशेरा अतिशय दिमाखदारपणे वावरताना दिसतो. मोठमोठाले भाताचे टोप, भाजीचे गरमागरम टोप उतरविण्यासाठी भक्कमपणे साथ देऊ लागले. आता छोट्यामोठ्या घरात भानशेरा दिसत नाही.
माणसांचे बाहेर हॉटेलमधील जेवण, ऑनलाईन मागवलेले जेवण यामुळे भानशेरा खूपच दुःखी बनत गेले. रोजच्या रोज चुलीबरोबर साथ देणारे भानशेरे कमालीचे दुःखी जाणवू लागले.नित्यनियमितपणे पेटणारी चूल आर्थिक संपन्नतेमुळे आठवड्यात कधीतरी पेटत असे. त्यामुळे भानशेरा चुलीचे अस्तित्व पाहुन कमालीचे खचून जाऊ लागले आणि अलगदपणे हळूहळू गायब होऊ लागले.

घरातली चूल आणि चुलीच्या पुढे एक 'वायल' केलले असायचे. चुलीच्या पाटणावर अंतर्गत गोलाकार लहान भोक केलेले असते. त्याला 'वायल' म्हणतात. चुलीतली आग त्या 'वायला'त पुढे जात त्या वायलावर सदानकदा चहाचे पातेले ठेवलेले असायचे. वायल म्हणजे त्याकाळातील मायक्रोवेव्हनच! त्यामुळे चहा सदानकदा गरमच राहायचा. आलेल्या गेलेल्याना पटकन गरम चहा मिळत असे. दोन बावळयाची चूल. दोन वायल असायची. दोन फूकनळी.बाजूक लाकडे, शेणी ठेवंक एक लहानशी चिरोटी.


काळाच्या ओघात भानशेरा लोक विसरायला लागले. आता आधुनिक पद्धतीची 'वुडन स्टीक' वाली भांडी आली. पण पूर्वीचा 'उतव' आणि भानशेरा कधीच विसरायला शक्य होणार नाही. मे महिन्यात काजू बीया, रातांबे विकून गाठीला थोडासा पैसा जमला म्हणजे प्रत्येक घरात मीठाची फरी घेतली जायची.संपूर्ण वर्षभर पुरेल एवढा मसाला कुटून ठेवला जायचा. आठवड्याच्या बाजाराला जावून सुकी मच्छी, सुकटे आणून व्यवस्थित सुकवून उतवावर ठेवली जात असत.

'उतव' म्हणजे चूलीच्यावर सहा ते सात फुटावर बांबूपासून नाहीतर लाकडाच्या रिपीपासून बनवलेली चौकट असते. त्या उतवार सगळे सुकत घातले जात असे. खालून चुलीची उब मिळत असे. पावसाच्या दिवसात मासे नाही मिळाले की मग दुधाची तहान ताकावर म्हणतात तसे उतवावर ठेवलेल्या सुकटावर सुक्या मच्छीवर सगळे भागायचे. काही काही घरात मांसाहारी जेवण स्वयंपाक घरातील चुलीवर बनवत नाहीत. देवाचा नैवेद्य चुलीवर बनवला जातो.मग मागीलदारी न्हाणीघराच्या जवळ आंघोळीसाठी पाणी तापवण्यासाठीची चूल असायची तिथेही उतवावर सुकटे ठेवली जायची. मग चुलीच्या पाटणाच्या बाजूक ती मिठाची फरी व्यवस्थित ठेवली जाता असे. खड्याचे मीठ रोजच्या जेवणात वापरण्यासाठी पटकन सापडायला हवे म्हणून चुलीच्या पाटणाजवळ मिठाची फरी ठेवलली असायची. गुराढोरांना पाणी देताना पाण्यात घालण्यासाठी मीठ लागायचे. तेव्हा काही काही घरात दोन फरी मीठ घेवून ठेवावे लागायचे. पण पावसाळयात मीठ सगळे चितवलू जायचे, पाणी सुटायचे तेव्हा मातीच्या भिंतीवर सगळा ओलावा दिसायचा. पालीसारखी ती ओल वर वर सरकत जायची. पण सगळा पावसाळाभर फऱ्याचे मीठ पुरुन उरायचे.'उतवावर' पावसाळ्यात भिजलेले कांबळा (घोंगडी), कपडे सुकवले जायचे. सफेद कांद्याची गाथन उतवावरच बांधली जायची. उतवाच्या बाजूक एक भिंतीत आडवा पुरलला खुंटा असायचा त्यात नेहमी सोरकूल अडकवून ठेवले जायचे. मग त्या सोरकूलात रोजची झणझणीत आमटी शिजायची.

'भानशेरा', 'वायल' आणि 'उतव' ह्या तिन्ही गोष्टी त्या हलाखीच्या दिवसात साथ करत असायच्या. आज यांची ओळख दूरापास्त होत चालली आहे. जुन्या जाणत्या लोकांची त्याकाळची ही कल्पकता त्या काळी महत्वाची होती हे तो काळ अनुभवलेल्या माणसांनाच माहीत असेल. **

---

# योगी पावन मनाचा





जावे संतांच्या गावा!
अनुराधा म्हात्रे

**श्रीस्वामी स्वरूपानंद (पावस)**
**भाग ५**

श्रीस्वामी स्वरूपानंद यांनी महान योग्याला साजेल अशा पद्धतीने आपली जीवन यात्रा संपवली. इंग्रजी कालगणनेप्रमाणे १५ ऑगस्ट २०२४ ला त्यांच्या महानिर्वाणाला ५० वर्ष पूर्ण होतील. स्वामी सारख्या विभूती देहाने या जगात नसल्या तरी त्यांचे वांड्मय, त्यांचे जीवन चरित्र साधकांना कायम मार्गदर्शन करीत असते. त्यांचे चरित्र सांगून पूर्ण होत असताना त्यांचा उपदेश आणि सर्वसामान्यांना आकर्षित करणारे त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील काही पैलू याचा आढावा घेणे उचित ठरेल.

श्री स्वामी स्वरूपानंद यांनी पावस (जिल्हा रत्नागिरी) सारख्या छोट्या गावांत राहून अध्यात्म क्षेत्रांत फार मोठे काम केले. संसाराच्या चक्रात अडकलेल्या दीनदुबळ्या दुःखीकष्टी लोकांचा उद्धार करण्याचे हे कार्य करत असताना, त्यांनी ज्ञानेश्वर माऊलींनी सांगितलेले सूत्र कायम हृदयी धरले. अलौकिक नोहावे। लोकांप्रती।। (ज्ञानेश्वरी अ. ३) लोकांमध्ये अलौकिक होऊ नये ही विचारधारा पक्की करून स्वामी अतिशय शांतपणे आपले कार्य करत होते. त्यांनी स्वतःचा वेगळेपणा किंवा मोठेपणा कधीही दाखवला नाही.

एकदा एक तरुण मुलगा, साधुबुवांना भेटायचे या अपेक्षेने श्री स्वामी स्वरूपानंदांकडे आला होता. चार चौघांसारख्याच दिसणाऱ्या शुभ्रवेषधारी स्वामींना पाहून तो थोडा गोंधळलाच! श्री स्वामींनी त्याचा हा गोंधळ अचूक टिपला आणि मिश्किल हसून त्याला म्हणाले, 'अरे अध्यात्म म्हणजे गूढपणे वागणे बोलणे नव्हे. अध्यात्म म्हणजे सहज वागणे. शांतपणे आनंदात ईश्वराची लीला अनुभवणे होय! अध्यात्म म्हणजे अखंड प्रसन्नता आणि परम शांती! 'इतक्या साध्या सोप्या शब्दांत स्वामींनी अध्यात्माचे मर्म सांगितले. आपण गुणाने उच्च असावे पण लोकांत वावरताना चार चौघांसारखेच असावे; असे स्वामींचे सांगणे असे.

प्रपंच नेटका असेल तरच सामान्य माणूस परमार्थ नीट करू शकतो. हे सामान्य माणसांचे इंगित श्रीस्वामींनी पुरेपूर ओळखले होते. ते तरुण साधकांना नेहमी सांगत, 'पैसा जपून वापरावा. काटकसरीने खर्च करावा. वासना अगणित असतात किती पुऱ्या करणार? आणि त्याचबरोबर ते साधकांना कळकळीने उपदेश करत, प्रपंचात सुखापेक्षा दुःखच जास्त! प्रपंच हे गळके भांडे आहे. हे नेहमीच लक्षात ठेवले पाहिजे. हरिनाम हेच या भवसागराच्या दुःखातून मनुष्याला तारते.

श्री स्वामी स्वरूपानंदांचे वागणे बोलणे अतिशय मृदू, वत्सल ते शांतपणे व हळू आवाजात बोलत. भाषा आर्जवी असे. सहसा ते कधी कुणाला एकेरी नावाने संबोधत नसत. मित्रांना आणि विद्यार्थ्यांनाही अहोजाहो करत. एखाद्याला त्याच्या हिताची गोष्ट सांगायची असली तरी, श्रींच्या बोलण्यात नेहमी, ' मला असं वाटतं, असं केलं तर बरं, बघा तुम्हाला जमलं तर, आपण असं करायला हवं, अशा प्रकारची वाक्ये असायची. वास्तविक स्वामींकडे येणारी माणसे ही स्वामींची भक्त असून स्वामीं बद्दल आदर बाळगणारी होती पण स्वामींनी कधीही आदेश वजा वाक्य उच्चारली नाहीत.

पेणचे पूज्य ल. रा. फडके उर्फ अमलानंद हे स्वामींचे अंतरंग शिष्य. एकदा एका विषयावर त्यांच्याशी बोलत असताना स्वामी म्हणाले, 'वादविवाद होईल असे आपणास काहीच नको. जग हे त्रिगुणांनी व्यापलेले आहे; हे समजून जपून वागावे बोलावे! अशी माझी आपली तुम्हाला सूचना. वास्तविक श्रीअमलानंद हे स्वामींचे अनन्य भक्त. प्रसंगी जीवाची बाजी लावून त्यांनी स्वामींचा शब्द झेलला असता तरी स्वामी म्हणतात, ही माझी सूचना आहे. त्यांच्या बोलण्यात कधीही अभिनवेश किंवा आग्रह नसायचा.

श्री स्वामी कधीच कुणावर कसलीही सक्ती करत नसत पण स्वतः मात्र लोकांच्या हितासाठी सदैव दक्ष असत. त्यासाठी प्रसंगी पदरमोड ही करत. मुंबईकडचा एक तरुण नोकरी सुटल्यामुळे अतिशय अडचणीत सापडला होता. तो श्री अमलानंद यांना भेटायला गेला. तेव्हा पू.अमलानंदांनी त्याला पावसला जाऊन श्री स्वरूपानंदांना भेटायला सांगितले. त्या मुलाने आपली सर्व हकीकत स्वामी स्वरूपानंदांना पत्राने लिहून कळवली. स्वामींनी त्या पत्राचे सविस्तर उत्तर दिले शिवाय पावसला येण्यासाठी पैसेही मनिऑर्डरने पाठवले. अशी एक ना दोन किती तरी उदाहरणे सांगता येतील. स्वामींचे ही लोकांबद्दलची करुणा पाहून म्हणावेसे वाटते की, 'ऐसी कळवळ्याची जाती!'

श्री स्वामींना त्यांच्या प्रकृतीमुळे फार वेळ बसणे किंवा बोलणे शक्य नव्हते, तरीही स्वामींनी त्याची तमा न बाळगता वेळोवेळी साधकांना मार्गदर्शन केले. त्यांच्या अडचणींचे निवारण केले. श्रीस्वामींची नाथपंथीय साधना आहे. म्हणजे सोहम् साधना आहे. प्रत्येक व्यक्तीमध्ये परब्रम्हाचा अंश आहे. शरिरातील चैतन्य हेच परब्रह्म आहे. हाच त्याचा 'स्व' आहे. या खऱ्या 'मी' ला ओळखणे हाच परमार्थ आहे. श्री स्वामी अमृतधारा या त्यांच्या काव्यात म्हणतात,

मी मी म्हणसी परी जाणसी काय खरा 'मी' कोण? स्वामींनी लोकांना हा खरा मी ओळखायला शिकवले.

स्वरूपाची ओळख स्वामी भक्तांना उत्तम प्रकारे करून देत असत त्या बाबत बाबुलाल पठाण यांचे उदाहरण अतिशय लक्षणीय आहे. स्वामींच्या भक्तगणात सर्व जातींचे आणि धर्मांचे लोक होते. बाबूलाल पठाण हे मुस्लिम धर्मीय पण स्वामींचे निस्सीम भक्त. त्यांनी ज्ञानेश्वरी स्व हस्ते लिहून स्वामींना अर्पण केली होती या बाबुलालांना ज्ञानेश्वरीतील स्वधर्म या संकल्पनेचा अर्थ समजून घ्यायचा होता. स्वामींनी त्यांना सांगितले,'

'सकळ धर्मामध्ये धर्म । स्वरूपी राहणे हा स्वधर्म ।।

' स्वतःच्या निजरूपांत राहणे, 'स्व' स्वरूपी राहणे हाच तुमचा स्वधर्म. मग बाहेरचा धर्म काही का असेना'!

समाधी घेऊन पन्नास वर्षे झाली पण प्रति ज्ञानेश्वर म्हणून ओळखली जाणारी स्वरूपानंद माऊली, आजही भक्तांवर कृपा करून त्यांचा उद्धार करते. पावस (जिल्हा रत्नागिरी) येथे श्री स्वामी स्वरूपानंद यांचे अतिशय सुंदर असे समाधी मंदिर आहे. जवळच परगावच्या भक्तांना राहण्यासाठी भक्तनिवास आहे. भक्तांची राहण्याची, जेवणा खाण्याची व्यवस्था अतिशय उत्तम आहे. या परिसरातील स्वच्छता तर वाखाणण्याजोगी आहे. देसाई मंडळींनी स्वामी देहांत असताना स्वामींची आणि त्यांच्या भक्तांची उत्कृष्ट सेवा केलीच पण आजही सेवामंडळाच्या माध्यमातून देसाई बंधू भक्तांची व्यवस्था चोख ठेवत आहेत.

स्वामी समाधी मंदिरात वर्षभर ज्ञानेश्वरी पारायण, स्वामींच्या वाड्मयाचे पारायण, भजन, कीर्तन, प्रवचन अखंड नामजप, वेगवेगळे उत्सव असे कार्यक्रम सतत चालू असतात. सात्विक आनंद आणि मानसिक समाधान मिळवण्यासाठी प्रत्येकाने स्वामी स्वरूपानंदांच्या समाधी मंदिराला आवश्यक भेट द्यावी आणि भक्तवत्सल स्वामींना त्यांच्याच शब्दात प्रार्थना करावी,


**' उदारा जगदाधारा देईं मज असा वर।**
**स्व-स्वरूपानुसंधानीं रमो चित्त निरंतर।।'**

**

# एकदा देव भेटला


एक दिवस मी असा सरळ रस्त्याने चाललो होतो. तेवढ्यात अचानक समोरून देव आला. मी म्हटलं देवा इकडे कुठे. देव म्हणाला मी तुझ्याकडेच आलोय. मी म्हणालो माझ्याकडे का देव म्हणाला मी आज खूप खुश आहे. माग. तुला जे हवं ते माग मी म्हटलं देशील तु माग. तुला काय हवं ते माग. मग मी म्हटलं देवा मला एक मोठं घर दे.

एक सुंदर बायको दे. दोन पोर दे. पोलिसाची नोकरी दे. बँक भरून पैसा दे. एक चार चाकी गाडी दे. सर्व क्षेत्रातल्या नामांकित लोकांची माझी ओळख असू दे. आणि मला कायम जवान राहू दे. मग देवाने मला दिलं. देवाने मला दिलं दहा बाय दहाचं घर. कशाला पाहिजे म्हटला, तुला मोठं घर. तु काय दहा बाय दहाच्या घरात जगू शकणार नाहीस का. मग म्हटला, तुला सुंदर बायको हवी ना. कशाला पाहिजे तुला सुंदर बायको. एखादी साधारण दिसणारी, डोळ्याने थोडी चकणी असणारी, जिचे केस उंदराच्या शेपटी एवढे असणारी. अशी असेल तर काय बिघडणार आहे का तुझं. आणि काय म्हणालास तुला दोन पोरं पाहिजेत. आणि नाही झाला पोरगा तर तु जगू शकणार नाहीस का. पोरगाच का पोरगी का नको. तुला पोलिसाची नोकरी हवी ना. नाही देत तुला पोलिसाची नोकरी जा वॉचमनची नोकरी कर. दोघांचं काम तर एकच आहे.



**निलेश साठे**

सुरक्षा करण्याचं. आणि काय म्हणलास बँक भरून पैसा दे. कशाला पाहिजे तुला बँक भरून पैसा. महिन्याच्या शेवटी तुला थोडी काटकसर करायला लागणार बघ तुझं आयुष्य कुठे थांबते का ते. तुला चार चाकी गाडी हवी आहे.? नाही देत तुला चार चाकी. एक साधी सायकल घे. खरंतर तिची पण गरज नाही तुला. मोठमोठ्या लोकांसोबत तुला ओळख हवी आहे? अरे तु घराच्या बाहेर पडला तर तुला कोणी साधं काळ कुत्रं विचारणार नाही. बघूया तुझं कुठे काय बिघडते ते. आणि आता तुला कायम जवान राहायचं आहे. म्हणजे तुला मरायचं नाही. चल बस रेड्यावर. मी तुला न्यायला आलोय. असं म्हणत देवाने माझा कान पकडला आणि मला पुढे खेचू लागला. मी हळूहळू स्लो मोशनमध्ये चालू लागलो. देव म्हटला हे काय करतोय. मी म्हटलं मला नाही यायचं. तसं देवाने एक हिसका दिला आणि मला थेट रेड्यावर बसवलं. मग रेडा तुगडूक तुगडूक तुगडूक तुगडूक तेवढ्यात माझ्या डोक्यात एक टपली बसली. आणि तोच तो नेहमीचा आवाज अहो तुम्हाला काय कळतं की नाही. चला व्हा मागे, व्हा मागे. आणि मला जोरात मागे ढकललं गेलं. मी कुस बदलली आणि पुन्हा झोपी गेलो. **



# जे पाहिलं जे भावलं! अमेरिका

**पुस्तक परीक्षण**
**प्रा. शाम जोगळेकर**
**मो. ९२७३३४३१७७**

जे पाहिलं जे भावलं! अमेरिका, हे गजानन देवधर यांचे प्रवासवर्णन पुण्याच्या ओशन वेव्हज पब्लिकेशनने देखण्या स्वरूपात प्रकाशित केले आहे. ''मनोगत'' मध्ये गजानन देवधर यांनी, शालेय वयातच अमेरिकेविषयीची माहिती कळल्याने कुतूहल निर्माण झाल्याचे स्पष्ट केले आहे. त्यामुळे बालपणीच प्रवास वर्णनात्मक पुस्तके आणि लेख वाचण्याची आवड निर्माण झाली. तीव्र इच्छाशक्तीच्या जोरावर ज्येष्ठ नागरिक असलेल्या गजानन देवधर यांनी पतीसह, सलग ७५ दिवस स्वतंत्रपणे मे ते जुलै २०१९ या काळात अमेरिकेत प्रवास केला. कोविडचा काळ संपल्यावर पुस्तकाचे लेखन केले. प्रवासाच्या दोघांच्या आवडीमुळे आजपर्यंत त्यांनी पंधरा देश स्वतंत्रपणे पाहिले आहेत. ईशा टूर्सचे कार्यकारी संचालक आत्माराम परब यांची प्रस्तावना या पुस्तकाला लाभली आहे. साठी ओलांडल्यावर उभयतांनी ७५ दिवसांचा अमेरिकेचा दौरा करण्याचे दिव्य केले.त्यामुळे परब स्तंभित झाले. तत्पूर्वी गजानन आणि उज्ज्वला यांनी लडाखची सफर ईशा टूर्ससह केल्याने त्यांच्या व्यक्तिमत्वाचा परब यांना जवळून परिचय झाला होता. प्रा. गजानन देवधर यांचे अमेरिकेत स्थायिक झालेले, विविध विद्यार्थी या प्रवास काळात त्यांना भेटले. ''गुरुजन येती घरा, तोची दिवाळी दसरा'' अशीच त्यांची भावावस्था होती. पुस्तकाचे मुखपृष्ठ, मांडणी आणि सजावट प्रभाकर भोसले यांनी उत्तम प्रकारे केली आहे. छोट्यामोठ्या ७६ प्रकरणांतून हे पुस्तक वाचकांसमोर उलगडत जाते.

प्रयाण, या पहिल्या प्रकरणात गजानन यांनी १४ मे २०१९ रोजी रात्री अकरा वाजता विमानतळाकडे जाण्यापूर्वी, जुलै २०१८ पासून प्रवासाचा मार्ग आखून, त्याची कशी तयारी केली, याविषयी सविस्तरपणे लिहिले आहे. मुंबई ते सिएटल प्रवासातील अनुभवही मांडले आहेत. सिएटल विमानतळावरील महिला ऑफिसरने दीर्घकाळ अमेरिकेतील भ्रमंतीबद्दल अनेक प्रश्न विचारले. सर्व शंकांचे निरसन झाल्यानंतर शुभेच्छाही व्यक्त केल्या. नंतर देवधर अमोल आडगावकर या विद्यार्थ्याच्या घरी, त्याच्या गाडीतून गेले. सर्वांची भेट झाली आणि गप्पा गोष्टीही! तेथील मायक्रोसॉफ्टचा विशाल कॅम्पस पाहता आला. तेथे ५३ हजारांहून अधिक कर्मचारी काम करतात. बोईंग प्लांट आणि म्युझियम चे सविस्तर वर्णन देवधर यांनी केले आहे.




चार दिवसांनी सिएटल ते अलास्का, असा विमान प्रवास झाला. अलास्का हे अमेरिकेच्या मुख्य भूमीपासून खूप दूर आहे. तेथील सफरीचे सविस्तर वर्णन, नकाशासह वाचावयास मिळते. साक्रोमेंटो, सानफ्रान्सिस्को हे सहलीतील विविध टप्पे स्पष्ट केले आहेत. नंतरच्या टप्प्यातील ग्रँड कॅनियनचे सविस्तर वर्णन वाचकाला थक्क करते. नॅचरल हिस्टरी म्युझियम, हॉलीवुडला भेट देऊन, नंतर डेथ व्हॅली-बेट्टीचे सविस्तर वर्णन दिले आहे. लॉस एंजेलिस ते ऑस्टिन या प्रवासात देवधर यांना काही परिचित विद्यार्थ्यांच्या कुटुंबात राहता आले. ह्युस्टनला निसर्ग आणि कलेचा साधलेला सुंदर संगम त्यांना पाहता आला. पुस्तकांचे विशाल दालनही पाहता आले. तेथे निम्म्या किमतीत उत्तम स्थितीतील पुस्तके, ध्वनिमुद्रिका इ. विकत मिळतात. नंतरच्या प्रवासात देवधर यांना विविध प्रकारची भव्य वस्तुसंग्रहालये पाहता आली. वॉशिंग्टन डी.सी. येथे नॅशनल जिओग्राफिक सोसायटी आणि अन्य प्रसिद्ध ठिकाणे पाहता आली. कॉलेज जीवनापासून देवधर नॅशनल जिओग्राफीच्या प्रेमात का आणि कसे होते हे त्यांनी स्पष्ट केले आहे. अमेरिकेच्या राजधानीतील वैशिष्ट्यपूर्ण विविध दूतावासांचेही बाहेरून पाहून वर्णन केले आहे. कॅपिटॉल भेटीचे आणि अन्य प्रसिद्ध ठिकाणांचे वर्णनही दिले आहे. लायब्ररी ऑफ काँग्रेसचे वर्णन वाचकाला थक्क करते. फिलाडेल्फिया, प्रिन्स्टन विद्यापीठ येथील अनुभव नितांत वाचनीय आणि प्रेरक आहेत. तेथेच त्यांना ८४ वर्षांचे उत्साही मार्गदर्शक भेटले होते. १९६९ पर्यंत प्रिन्स्टनमध्ये पूर्ण वेळ अभ्यासासाठी विद्यार्थिनींना प्रवेश नव्हता, हे वाचून लेखकाप्रमाणेच वाचकांनाही आश्चर्याचा धक्का बसतो. आईन्स्टाईन या परिसरात वावरले तो प्रदेश पाहून भौतिकशास्त्राचे प्राध्यापक असणाऱ्या गजानन देवधर यांना धन्यता वाटली. बोस्टन टी पार्टी म्हणजे काय, याचाही तेथे गेल्यावर उलगडा झाला. एमआयटी म्युझियमचे वर्णन केले आहे. न्यूयॉर्कमधील विविध प्रसिद्ध ठिकाणे देवधर दांपत्याला सावकाशीने पाहता आली. नेवार्कहून देवधर यांनी मायभूमीकडे प्रयाण केले. दुबईमार्गे भारतात ते दोघे डोंबिवलीला सुखरूप पोहोचले. अमेरिकेतील सोळा राज्यांतील, तेवीस हजार किलोमीटरचा प्रवास सुखरूपपणे पार पडला होता. प्रवासातील विविध अनुभवांचे संचित त्यांच्याजवळ आता आले होते. कुतूहल आणि प्रवासाची आवड यामुळे गजानन आणि उज्ज्वला देवधर या दोघांना ही प्रदीर्घ, अनुभवसंपन्न करणारी सहल पूर्णत्वास नेता आली. विविध आणि विपुल, रंगीत आणि कृष्णधवल छायाचित्रांमुळे या पुस्तकाचे महत्त्व वाढले आहे. देवधर यांनी तेथील विविध अनुभव नेमकेपणाने टिपले आहेत. गजानन देवधर यांनी अमेरिकेची विविध वैशिष्ट्ये वाचकांसमोर सविस्तरपणे उलगडून दाखविली आहेत यामुळे हे पुस्तक वाचनीय आणि संग्राह्य झाले आहे. **

**पुस्तकाचे नाव : जे पाहिलं जे भावलं! अमेरिका**
**लेखक : गजानन देवधर,९८२०२८४८५९**
**प्रकाशक : ओशन वेव्हज पब्लिकेशन, पुणे.**
**प्रथम आवृत्ती : ८ ऑक्टोबर २०२३**
**पृष्ठे : २३६, किंमत : रु. ३००/-**

# ...तर टळतील पावसाळी अपघात

**पावसाळ्यामध्ये होर्डींग-डोंगर कोसळणे, पावसाच्या पाण्यात-पुरात माणसे, गाड्या वाहून जाणे किंवा पूल- भराव ढासळणे अशा घटना सातत्याने ऐकायला मिळत राहतात. सर्वसामान्यांच्या दृष्टीने हे दुर्दैवी प्रकार कमी होणे गरजेचे आहे. पावसाळ्यातली अपघातांची, आघातांची ही मालिका टाळायची असल्यास आपत्ती व्यवस्थापनाकडे बारकाईने लक्ष ठेवायला हवे. अनुभवातून शिकत काही नियम पाळले तर ही बाब अशक्य नाही.**

**अरूण बापट**

पावसाळा कितीही सुंदर आणि सर्जनशील असला तरी अलिकडे या काळात घडणारे अपघात एक नकारात्मक जाणीव निर्माण करुन जातात. वाढते शहरीकरण, चुकीचे नियोजन, नद्यांच्या माना मुरगाळून होणारी विकासकामे, बांधकामे न पाळले जाणारे निसर्गनियम अशा एक ना अनेक कारणांमुळे पावसाळ्यातील अपघातांची जंत्री वाढते. कधी भूस्खलन, कुठे दरडी कोसळणे, कुठे उघड्या गटारात पडल्याने होणारे अपघात, कुठे इमारती कोसळून झालेली जीवितहानी तर कुठे गावच्या गाव मातीखाली गाडले गेल्याच्या घटना या सुंदर ऋतूवर नकोसे बालंट आणतात. काँक्रिटच्या जंगलात पाणी भरल्यामुळे रहदारी खोळंबते तर पिकात पाणी शिरल्यामुळे शेतकऱ्यांच्या हाती येऊ पाहणारा घास मध्येच खोळंबतो. एकंदरच अलिकडेच पावसापेक्षा पावसाने झालेल्या नुकसानीची अधिक चर्चा होते. पावसात कोण कसे अडकले, कोणता पूल पाण्याखाली गेले, कोणते होर्डिंग पडून त्याखाली किती जण अडकले, आलेल्या पुरात किती वाहने वाहून गेली हे वा यासारखे विषय चावून चोथा होईपर्यंत चघळले जातात. पण मुळात या सर्व अपघातांसाठी पाऊस नव्हे तर आपले अयोग्य नियोजन आणि निसर्गावर आक्रमण करण्याची चूक कारणीभूत आहे हे कोणालाच समजत नाही, वा समजत असले तरी ते समजून घेऊन योग्य ती सुधारणा करण्याची क्षमताच आता उरलेली नाही. त्यामुळेच आताच्या पाऊसकाळात तरी आधीच्या चुकांमधून काही शिकण्याची तयारी ठेवणे गरजेचे आहे. अलिकडे पावसाचा पॅटर्न बदलला आहे. एकाच दिवशी ढगफुटीसारखा पाऊस पडत असल्याचे गेली काही वर्षे आपण अनुभवत आहोत. अर्थातच याचा मोठा फटका सहन करावाच लागतो. मुंबईत अतिवृष्टी झाल्यास शहरी भागात पाणी साठणे आणि वाहतुकीस अडथळा निर्माण होणे ही मुख्य समस्या असते. किंबहुना, मुंबईत दरवर्षी पावसाळ्यात अशा घटना घडतातच. त्यांची चर्चा होते परंतु त्या संदर्भात योग्य असे पाऊल उचलले गेल्याचे दिसत नाही. टीव्ही चॅनल्सवरील चर्चांमध्येही आरोप-प्रत्यारोप अधिक असतात आणि अशा घटनांबाबत वैज्ञानिक चर्चा, त्यावरील उपाय याबाबत फारच कमी वेळा बोलले जाते. २६ जुलै ही तारीख कधीच विसरणे शक्य नाही. या दिवशी मुंबईत जवळपास एक हजार मिलिमीटर पाऊस पडला आणि त्यामुळे सर्वत्र हाहाकार उडाला. अशा वेळी आपत्ती व्यवस्थापनाचे काय, असाही प्रश्न विचारला गेला. योगायोगाने त्या दिवशी मीही मुंबईतील पावसात अडकून पडलो होतो. त्यावेळी महाराष्ट्र सरकारने अशा घटनांसंदर्भात आपत्ती व्यवस्थापनाच्या दृष्टीने काही सूचना मागवल्या होत्या. त्यात मी एक सूचना केली होती. तथापि तिचा अंमलबजावणीच्या पातळीवर विचार करण्यात आला नाही.

अलीकडे मुंबईत जरासा पाऊस पडला तरी रस्त्यांवर पाणी साठते. याचे मुख्य कारण डांबरी रस्त्यांचे क्षेत्रफळ वाढणे हे आहे. मुंबईची सध्याची सांडपाणी वाहून नेणारी प्रक्रिया ७५ वर्षांपूर्वी बांधली आहे. एवढ्या वर्षात या प्रक्रियेचा विस्तार करण्याचे प्रयत्न झाल्याचे आढळत नाही. या पार्श्वभूमीवर मुंबईत अल्प पावसाने साठणाऱ्या पाण्यावर उपाय काय, असा प्रश्न विचारला जातो. सांडपाणी वाहून नेणारी मुंबईसारखी यंत्रणा जपानमधील टोकियो शहरात ५० वर्षांपूर्वी अस्तित्वात होती. परंतु त्यात बदल करण्याबाबत सखोल अभ्यास करण्यात आला आणि त्यातून काही उपाययोजना समोर आल्या. त्यात प्रामुख्याने टोकियोचे दोन बाय दोन किंवा तीन बाय तीन आकाराचे मार्ग तयार करण्यात आले. या मार्गांमधून पाणी समुद्रात जाण्याची व्यवस्था करण्यात आली. त्यासाठी साधारणत: दीड ते दोन मीटर डायमीटरचे पाईप जमिनीखालून टाकून त्यातून पाणी समुद्रात सोडण्यात आले. या पाईपना असणारे व्हॉल्व एकाच वेळी आणि एकाच दिशेने उघडतील अशी व्यवस्था करण्यात आली. अशा या पाईपलाईनमधून पाणी समुद्रात जाते. परंतु समुद्राचे पाणी पाईपलाईनच्या वर येत नाही. अशा रितीने शहरातील सांडपाण्याचा जलद गतीने निपटारा होत राहिला. त्या तुलनेत मुंबईच्या सांडपाण्याची विल्हेवाट लावणाऱ्या यंत्रणेचा विचार करायचा तर हे पाणी पाईपलाईनमधून समुद्रात सात ते आठ मीटर खोलीवर सोडले जाते. भरतीच्या वेळी हेच पाणी शहराच्या सखल भागात येते. टोकियोतील व्यवस्थेमुळे तेथील शहरी सांडपाण्याच्या विल्हेवाटीचा प्रश्न जवळजवळ सुटला आहे. तशाच पध्दतीने मुंबईच्या सांडपाण्याबाबत विचार होणे गरजेचे आहे.

पावसाळ्यात हमखास निर्माण होणारे आणखी एक संकट म्हणजे दरडी कोसळणे. यापूर्वी दरडी कोसळण्याचा प्रकार साधारणत: कोकण भागात होत असे. गेल्या काही वर्षात आपल्याकडे महामार्गांची तसेच अन्य काही मार्गांची निर्मिती करण्यात आली आहे. अशा कामांसाठी मोठमोठे खडक फोडावे लागतात. त्यामुळे खडकांमध्ये भेगा निर्माण होतात. पावसाचे पाणी या भेगांमध्ये गेल्यास ते आपल्या जागेवरून सरकतात. यालाच आपण दरडी कोसळणे असे म्हणतो. फोडलेला दगड हा सरळ ९० अंशात नसावा. त्यामुळे तो कोसळण्याची शक्यता वाढते. त्याऐवजी दगड १०० ते १०५ अंशात असल्यास दरड कोसळण्याची शक्यता कमी असते. रस्त्यालगतच्या दरडी कोसळू नयेत यासाठी जाळीचे पडदे लावण्यात येतात. यालाच शास्त्रीय भाषेत गॅबिऑन असे म्हणतात. या जाळ्यांमुळे दगड कोसळण्यास अटकाव होतो, त्यातूनही दगड कोसळल्यास ते जाळीला अडकतात. साहजिक ते वेगाने रस्त्यांवर येत नाहीत. त्यामुळे मोठी दुर्घटना टाळता येऊ शकते. समुद्र किनाऱ्यांलगत धूप थांबवण्यासाठी या जाळ्यांचा विशेष उपयोग केला जातो. कोकणच्या किनाऱ्यावर अशा प्रकारच्या गॅबिऑनचा उपयोग अधिक प्रमाणात केल्यास किनाऱ्याची धूप निश्चितपणे कमी होईल.







अलीकडे राज्यातील समुद्र किनाऱ्यावर चक्रीवादळ धडकले होते. शिवाय धुळीचे वादळही आले होते. अशा घटना घडत असतात. परंतु दुर्दैवाने कोणतीही घटना घडली तर त्यासाठी सरकारला जबाबदार धरले जाते आणि सरकारवर टीकेची झोड उठवली जाते. याला राजकीय कारण अधिक आणि वैज्ञानिक कारण कमी असते. याचे उदाहरण म्हणजे माळीणची दुर्घटना. माळीणमध्ये सरकारकडून पडकाई प्रकल्पाचे कार्य सुरू असून त्यामुळे ही दुर्घटना घडली असे म्हटले गेले. वास्तविक, माळीण, जुई वा अलिकडे पनवेलजवळील टेकडीवरच्या वस्तीत झालेली दुर्घटना गावाच्या वर उंचीवरील खडक घसरल्याने झाली. सरकारचे पडकाईचे काम सुरू असलेली जागा ही माळीण गावच्या खाली दहा ते १२ मीटरवर होती. त्यामुळे या कामाचा आणि माळीणच्या दुर्घटनेचा संबंध लावणे चुकीचे होते. परंतु तो लावून सरकारवर टीका करण्यात आली. हे वैज्ञानिक दृष्टीकोनातूनही अयोग्य आहे. दुसरीकडे आपत्ती व्यवस्थापनाबाबत सरकार योग्य ती काळजी घेत नाही हे ही तितकेच खरे आहे. मांढरदेवी यात्रेत झालेल्या दुर्घटनेत अनेक भाविकांना प्राण गमवावे लागले. त्यावेळी मंदिरात होणारी भाविकांची गर्दी आणि त्यावरील नियंत्रण तसेच त्या संदर्भातील उपाययोजनांबाबत बरेच बोलले वा लिहिले गेले. परंतु या घटनेपासून बोध घेत अन्य प्रमुख मंदिरांमध्ये मांढरदेवीसारखी दुर्घटना घडू नये म्हणून काही उपाय करण्यात आल्याचे दिसत नाही. विशेष म्हणजे मांढरदेवी मंदिर दुर्घटनेनंतर १४ जानेवारी २०११ रोजी केरळमधील शबरीमला मंदिरात झालेल्या भाविकांच्या चेंगराचेंगरीत १०२ जणांना प्राण गमवावे लागले.नैसर्गिक कारणांमुळे वा मानवी चुकांमुळे, दुर्लक्षांमुळे अनेक दुर्घटना घडत असतात. तथापि बऱ्याचदा प्रशासनातील शैथिल्यामुळे दुर्घटना घडल्याचेही आढळले आहे. या पार्श्वभूमीवर आता नाशिक येथे लवकरच कुंभमेळ्याला सुरूवात होत आहे. या सोहळ्यासाठी विविध संत-महंतांबरोबर लाखोंचा भक्तगण उपस्थित राहणार आहे. एवढ्या मोठ्या जनसमुदायाची व्यवस्था लावणे हे प्रशासनासमोरील मोठे आव्हान असणार आहे. त्याचबरोबर या सिंहस्थाच्या काळात आपत्ती व्यवस्थापनाच्या दृष्टीनेही महत्त्वाचे उपाय योजले जाणे गरजेचे आहे. सिंहस्थाच्या पर्वकाळात गंगास्नानासाठी भविकांची मोठी झुंबड उडते. यावेळी चेंगराचेंगरी होण्याची आणि त्यातून काही दुर्घटना घडण्याची शक्यता असते. त्या दृष्टीने गर्दीवर नियंत्रण ठेवण्याबरोबर नदीपात्रात जीवरक्षक तसेच नौका तैनात करण्यासारख्या उपाययोजनांवर भर दिला जायला हवा. अशा प्रकारची सतर्कता बाळगल्यास दुर्घटना टाळणे किंवा त्यांची तीव्रता कमी करणे शक्य आहे. अलीकडे विविध प्रकारच्या दुर्घटनांची संख्या वाढत आहे त्या बरोबर आपत्ती व्यवस्थापन यंत्रणेवरील जबाबदाऱ्या वाढत आहेत. त्या दृष्टीने ही यंत्रणा अधिक कार्यक्षम करण्याकडे सरकारला लक्ष द्यावे लागणार आहे. **

**निवडक**

## माजी कर्णधारासाठी खटाटोप

**नवी दिल्ली :** दिग्गज क्रिकेटपटू कपिल देव यांनी बीसीसीआयकडे त्यांच्या माजी संघसहकारी अंशुमन गायकवाड यांना मदत करण्याची विनंती केली आहे. भारताचे माजी क्रिकेटपटू आणि मुख्य प्रशिक्षक गायकवाड हे सध्या रक्ताच्या कर्करोगाचा सामना करत आहेत. ७१ वर्षीय गायकवाड यांच्यावर लंडनमधील किंग्स कॉलेज हॉस्पिटल येथे उपचार सुरू आहेत. तसेच, माजी क्रिकेटपटू मोहिंदर अमरनाथ, सुनील गावसकर, संदीप पाटील, दिलीप वेंगसरकर, मदनलाल, रवी शास्त्री आणि किर्ती आझाद हे देखील उपचारासाठी निधी गोळा करत आहेत.

## बायोपिकमध्ये काम करावे

**मुंबई :** टी-२० विश्वचषक जिंकल्यामुळे कर्णधार रोहित शर्मा सध्या चर्चेत आहे. त्यामुळे सध्या रोहित शर्माचे चाहते त्याचा बायोपिक रुपेरी पडद्यावर पाहायला उत्सुक आहेत आणि एका चाहत्याने तर एका मराठी अभिनेत्याने रोहितची भूमिका साकारावी, अशी इच्छा व्यक्त केली. हा अभिनेता आहे सुयश टिळक. नुकतेच सुयशने आस्क मी नाऊ या फीचरद्वारे त्याच्या चाहत्यांशी संवाद साधला. या सेशनमध्ये एका चाहत्याने सुयशने रोहित शर्माच्या बायोपिकमध्ये काम करावे, अशी इच्छा व्यक्त केली.

## पाकिस्तानशी क्रिकेट नकोच

**नागपूर :** पाकिस्तानमध्ये पुढील वर्षी आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफी खेळली जाणार आहे. परंतु, पाकिस्तानचे अतिरेकी जम्मू-काश्मीरमध्ये दहशतवादी कारवाया करून निरपराध भारतीय सैनिकांना मारत असताना कुटील कारस्थान रचणाऱ्या व जेहादी मानसिकतेच्या या देशात भारतीय संघाने अजिबात क्रिकेट खेळू नये, असे स्पष्ट मत उपराजधानीतील माजी क्रिकेटपटू व प्रशिक्षकांनी व्यक्त केले आहे. देश प्रथम नंतर क्रिकेट अशी ठाम भूमिका घेत त्यांनी केंद्र सरकार व बीसीसीआयच्या संभाव्य निर्णयाचे स्वागत केले.

## जागा वाचवण्यात यशस्वी

**नवी दिल्ली :** २०२४च्या टी-२० विश्वचषकात बाबर आझमच्या नेतृत्वाखालील पाकिस्तान संघाच्या खराब कामगिरीनंतर त्यांना सतत टीकेला सामोरे जावे लागत आहे. आणि आता गेल्या काही दिवसांपासून पीसीबीने पाकिस्तानी संघात सुधारणा करण्यासाठी पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. यादरम्यान पाकिस्तान संघाने नवीन निवड समितीची घोषणा केली आहे. त्यामध्ये मागील निवड समितीचा भाग असलेले मोहम्मद युसूफ आणि असद शफीक यांना त्यांची जागा कायम ठेवण्यात यश आले आहे.

## तुषारे देशपांडेचे पदार्पण

**हरारे :** भारतीय क्रिकेट संघाचा झिम्बाब्वेविरुद्ध टी-२० मालिकेतील चौथा सामना शनिवारी (दि.१३) खेळण्यात आला. या सामन्यात भारताचा शुभमन गिलने नाणेफेक जिंकत प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. या सामन्यासाठी भारतीय संघाने मोठा बदल केला असून मराठमोळ्या तुषार देशपांडेला प्लेइंग इलेव्हनमध्ये संधी देण्यात आली आहे. त्याला आवेश खानच्या जागेवर संधी देण्यात आली आहे. त्यामुळे तुषार देशपांडे हा भारताकडून टी-२० क्रिकेटमध्ये पदार्पण करणारा ११५ वा खेळाडू ठरला आहे.

# इंग्लंडची वेस्ट इंडिजवर मात

**। लॉर्ड्स । वार्ताहर ।**

**वेगवान गोलंदाज जेम्स अँडरसने शुक्रवारी (दि.१२) निवृत्त झाला. इंग्लंडने वेस्ट इंडीजवर एक डाव व ११४ धावांनी मात करीत तीन सामन्यांच्या कसोटी मालिकेत १-० अशी आघाडी घेत जेम्स अँडरसनला विजयाने निरोप देण्यात आला. कसोटी क्रिकेटमध्ये त्याने एकूण ७०४ बळी मिळवले आहेत. अखेरच्या कसोटीत त्याने चार फलंदाज बाद केले.**



वेस्टइंडीजची अवस्था गुरुवारी अखेरीस सहा बाद ७९ धावा अशी बिकट झाली होती. शुक्रवारी पहाटे त्यांचा दुसरा डाव १३६ धावांवरच संपुष्टात आला. पहिल्या डावात प्रभावी कामगिरी करणाऱ्या गस ॲटकिन्सन याने दुसऱ्या डावातही ठसा उमटवला. त्याने ६१ धावा देत पाच फलंदाजांना पॅव्हेलियनचा रस्ता दाखवला. जेम्स अँडरसनने ३२ धावा देत तीन फलंदाज बाद केले. गस ॲटकिन्सन (७/४५ व ५/६१) याने बारा फलंदाज बाद करीत कसोटी गाजवली. जवळपास अडीच दिवसांच्या आतमध्ये हा कसोटी सामना संपला.

### जेम्स अँडरसनची महत्त्वपूर्ण आकडेवारी

जेम्स अँडरसन १८८ कसोटी सामने खेळला आहे. तो सचिन तेंडुलकरनंतर (२०० कसोटी) सर्वाधिक कसोटी सामने खेळणारा क्रिकेटपटू ठरला. जेम्स अँडरसनने लॉर्ड्स येथे सर्वाधिक १२३ बळी मिळवले आहेत. जेम्स अँडरसनने कसोटीत एका डावात पाच किंवा त्यापेक्षा जास्त बळी ३२ वेळा मिळवले आहेत. पाच किंवा त्यापेक्षा जास्त बळी सर्वाधिक वेळा मिळवणाऱ्या गोलंदाजांच्या यादीत तो सातव्या स्थानावर आहे. क्रिकेटच्या तिन्ही प्रकारांत एका मैदानात सर्वाधिक १४१ बळी मिळवत जेम्स अँडरसनने तिसरा क्रमांक मिळवलेला आहे.

### जेम्स अँडरसनला विजयाने निरोप



एक काळ असा होता की विराट कोहलीला कोणत्याही चेंडूवर बाद करू शकतो, असा विचार मनामध्ये यायचा. पण आता त्याला बाद करूच शकत नाही, असे वाटते. याचाच अर्थ प्रत्येक खेळाडूच्या कारकीर्दीत चढ-उतार येतच असतात. दुखापती, निवडप्रकिया, संघातून वगळण्यात येणे अशा बाबींचा अडथळा मलाही आला. पण, माझ्या खेळातील कौशल्याच्या जोरावर सातत्याने संघात पुनरागमन केले.

-जेम्स अँडरसन, इंग्लंडचा वेगवान गोलंदाज.

## पोयनाडच्या आराध्य पाटीलचे यश



**। पेझारी । वार्ताहर ।**

स्पर्धा परीक्षांचा पाया प्राथमिक स्तरावरच भक्कम व्हावा, या उद्देशाने महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणेतर्फे घेण्यात आलेल्या शिष्यवृत्ती परीक्षेत पोयनाड येथील को.ए.सो. ना.ना. पाटील हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयातील इयत्ता पाचवीतील विद्यार्थी आराध्य समीर पाटील हा रायगड जिल्हा गुणवत्ता यादीमध्ये अकरावा तर अलिबाग तालुका गुणवत्ता यादीध्ये चौथ्या क्रमांकाचा मानकरी ठरलेला आहे.

आराध्य हा शालेय अभ्यासाबरोबरच इतर ॲक्टिव्हिटीजमध्ये सुद्धा खूपच हुशार आहे. विशेषतः बासरी वादन आणि अभिनय क्षेत्रामध्ये आराध्यने जिल्हा व राज्यस्तरावर अनेक पारितोषिके मिळविलेली आहेत. अशा या तल्लख बुध्दीच्या, गुणी विद्यार्थ्यांने मिळविलेल्या या यशाबद्दल शाळेचे सभापती माजी आ. सुभाष पाटील तथा पंडित शेठ, माजी राजिप सदस्या भावना पाटील, को.ए.सो. समन्वय समिती सचिव अशोक गावडे, पेझारी केंद्रप्रमुख वि.का. पाटील, मुख्याध्यापक शशिकांत पाटील, शिक्षक प्रतिनिधी देवेंद्र पाटील, सत्र प्रमुख समीर भोईर, उदय पाटील, तृप्ती पिळवणकर आणि सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.

तसेच, आराध्यचे पालक रंजना पाटील, समीर पाटील मार्गदर्शन करणारे शिक्षक सुनिता पाटील, सुवर्णा पाटील, जयश्री आंधळे, सुप्रिया म्हात्रे, निनाद पाटील यांचेही शाळा समितीतर्फे अभिनंदन करण्यात आले.

## टी-२० विश्वचषकावरून वाद

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

टी-२० विश्वचषकाच्या आयोजनाबाबत या स्पर्धेदरम्यानच अनेकांनी प्रश्न उपस्थित केले होते. आता आयसीसीच्या वार्षिक बैठकीत यावर चर्चा होणार आहे. श्रीलंकेत होणाऱ्या या बैठकीपूर्वीच आयसीसीच्या दोन वरिष्ठ अधिकाऱ्यांनी आपल्या पदांचा राजीनामा दिला आहे. यामागे आयसीसी टी-२० विश्वचषकाच्या आयोजनातील गोंधळ असल्याचे सांगितले जात आहे.

श्रीलंकेत १९ जुलैपासून होणाऱ्या आयसीसीच्या वार्षिक बैठकीपूर्वीच नुकत्याच पार पडलेल्या आयसीसी टी-२० विश्वचषकाच्या आयोजनाची जबाबदारी असलेल्या दोन अधिकाऱ्यांनी राजीनामा दिला आहे. गेल्या महिन्यात वेस्ट इंडिज आणि अमेरिकेत झालेल्या टी-२० विश्वचषक स्पर्धेच्या खराब नियोजनावर प्रश्न उपस्थित झाल्यानंतर इव्हेंट हेड ख्रिस टेटली आणि मार्केटिंग आणि कम्युनिकेशनचे महाव्यवस्थापक क्लेअर फर्लांग यांनी राजीनामा दिला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, अनेक आयसीसी सदस्यांनी आयसीसी टी-२० विश्वचषकाच्या आयोजनाबाबत प्रश्न उपस्थित केले होते. यामध्ये विशेषतः अमेरिकेत आयोजित स्पर्धांमध्ये बजेटपेक्षा जास्त पैसे खर्च करण्याबाबत प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत. असोसिएट सदस्य संचालक पंकज खिम जी यांनी सर्व सभासदांना पत्र लिहून कार्यक्रमादरम्यान झालेल्या खर्चाचे ऑडिट करण्याची मागणी केली आहे.

## युवीने कांगारूंना धारेवर धरलं

**। बर्मिंगहॅम । वृत्तसंस्था ।**

बर्मिंगहॅम येथे खेळल्या जात असलेल्या 'वर्ल्ड चॅम्पियन्स ऑफ लिजेंड्स' लीगमध्ये भारतीय चॅम्पियन्सचा कर्णधार असलेल्या युवराज सिंगने शुक्रवारी रात्री ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या उपांत्य फेरीच्या सामन्यात केवळ २८ चेंडूत पाच षटकारांच्या मदतीने ५९ धावांची शानदार खेळी केली. यादरम्यान युवीच्या बॅटमधून चार शानदार चौकारही आले. युवराजची ही खेळी पाहून चाहत्यांना २००७ च्या टी-२० विश्वचषकात ऑस्ट्रेलियाविरुद्धची ३० चेंडूत ७० धावांची खेळी आठवली. आजही तीच गोष्ट ४२ वर्षांच्या युवराजात दिसते, जी १५ वर्षांपूर्वी दिसली होती.

ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या उपांत्य फेरीत भारत प्रथम फलंदाजी करताना २० षटकांत ६ गडी गमावून २५४ धावा केल्या होत्या. लक्ष्याचा पाठलाग करताना कांगारूंना केवळ १६८ धावा करता आल्या. इंडिया चॅम्पियन्ससाठी युवराजने अवघ्या २८ चेंडूत ५९ धावा केल्या. इरफानने ५० धावा, युसूफने ५१ धावा आणि उथप्पाने ६५ धावा केल्या. त्यानंतर गोलंदाजीत कुलकर्णी आणि नेगी यांनी प्रत्येकी दोन बळी घेतले. तर, हरभजन आणि इरफान यांना प्रत्येकी एक यश मिळाले. ऑस्ट्रेलियाला पराभूत केल्यानंतर भारतीय संघाने फायनलमध्ये प्रवेश केला आहे.



## पाकिस्तानात खेळने कितपत सुरक्षित?

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

आगामी चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५चे आयोजन पाकिस्तानमध्ये होणार आहे. परंतु, भारतीय संघ तेथे सहभागी होण्यासाठी जाणार की नाही याबाबत अद्याप निर्णय झालेला नाही. गेल्या अनेक वर्षांपासून भारत आणि पाकिस्तानमधील संबंध चांगले नाहीत. अशा परिस्थितीत या प्रकरणाचा अंतिम निर्णय केंद्र सरकारवर अवलंबून आहे. पाकिस्तानमध्ये भारतीय क्रिकेटपटूंवर पहिला हल्ला १९८९-९० मध्ये झाला होता. या दौऱ्यादरम्यान एका धार्मिक संघटनेशी संबंधित व्यक्तीने के. श्रीकांतला धक्काबुक्की केली होती. १९९७ च्या पाकिस्तान दौऱ्यातही एकदिवसीय मालिकेदरम्यान भारताच्या ४ खेळाडूंवर दगडफेक करण्यात आली होती. सौरव गांगुली, नीलेश कुलकर्णी, आबे कुरुविला आणि देबाशीष मोहंती हे ते चार खेळाडू होते. यानंतर २००६ मध्येही पाकिस्तानी चाहत्यांनी सचिन तेंडुलकरला लक्ष्य करत कराची कसोटीदरम्यान त्याच्यावर दगडफेक केली होती. यानंतर इरफान पठाणलाही २००६ मध्ये पाकिस्तान दौऱ्यावर अशाच एका घटनेला सामोरे जावे लागले होते. या दौऱ्यात कोणीतरी त्याच्यावर धातूच्या वस्तूने हल्ला केला होता.

## युवा क्रिकेटपटूने मागीतली माफी

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारताची स्टार बॅडमिंटनपटू सायना नेहवालच्या एका वक्तव्यावर अवमानकारक टिप्पणी करणे भारताचा युवा क्रिकेटपटू अंगक्रिश रघुवंशीला भारी पडले आहे. ट्रोलर्सच्या निशाण्यावर आल्यानंतर त्याने आपली चूक मान्य करत माफी मागितली. अलीकडेच एका पॉडकास्टदरम्यान सायना नेहवाल क्रिकेट आणि इतर खेळांबद्दल बोलली होती. या पॉडकास्टची एक क्लिप सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. पॉडकास्टमध्ये तिने इतर खेळांना क्रिकेटपेक्षा शारीरिकदृष्ट्या कठीण असल्याचे म्हटले होते. यावर अंगक्रिश रघुवंशी याने टिप्पणी केली.

## ऑलिम्पिकमध्ये नवीन खेळांचा समावेश


**। पॅरीस । वृत्तसंस्था ।**

जगातील सर्वात मोठा खेळाचा महाकुंभ म्हणजे ऑलिम्पिक. या ऑलिम्पिकला १८९६ मध्ये सुरुवात झाली असून २६ जुलैपासून ३३वे उन्हाळी ऑलिम्पिक खेळले जाणार आहे. पॅरिसमध्ये होणाऱ्या या ऑलिम्पिकमध्ये अनेक नवीन गोष्टींसोबत नवे खेळ पाहायला मिळणार आहेत. या ऑलिम्पिकचे आयोजन करण्यासाठी पॅरिसने १० वर्षांपूर्वीच तयारी सुरू केली होती. यावेळी २०२४ पॅरिस ऑलिम्पिकमध्ये चार नवीन खेळांचा समावेश करण्यात आला आहे. यावेळी 'ब्रेक डान्सिंग' ऑलिम्पिकमध्ये पदार्पण करणार आहे. तसेच, स्केट बोर्डिंग, सर्फिंग आणि स्पोर्ट्स क्लाइंबिंगचाही ऑलिम्पिकमध्ये समावेश करण्यात आला आहे. याशिवाय यावेळी कराटे, बेसबॉल आणि सॉफ्टबॉल हे खेळ ऑलिम्पिकचा भाग नसतील. हे खेळ टोकियो ऑलिम्पिकचा भाग होते. मात्र, पॅरिस ऑलिम्पिकमध्ये त्यांना जागा मिळालेली नाही. पॅरिस ऑलिम्पिकमध्ये समाविष्ट करण्यात आलेल्या चार नवीन खेळांसाठी एकही भारतीय खेळाडू पात्र ठरलेला नाही.

## गौतमचा 'गंभीर' संदेश

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

जुलै महिन्याच्या अखेरीस होणाऱ्या श्रीलंका दौऱ्यातून भारतीय संघाच्या मुख्य प्रशिक्षकपदाची जबाबदारी स्वीकारणाऱ्या माजी अनुभवी गौतम गंभीरने अलीकडेच सर्व फॉरमॅटमध्ये खेळणाऱ्या खेळाडूंवर भर दिला आहे. गौतमचा बीसीसीआयसोबत ३१ डिसेंबर २०२७ पर्यंत करार आहे. आणि त्याचे पहिले आव्हान याच महिन्यात सुरू होणार असून एका मुलाखतीत गंभीरने खेळाडू व्यवस्थापन आणि निवडीबाबत आपली प्रतिक्रया जाहीर केली आहे.



गंभीर म्हणाला की, माझा पूर्ण विश्वास आहे की, जर तुम्ही चांगले (तंदुरुस्त) असाल तर तुम्ही सर्व फॉरमॅटमध्ये खेळले पाहिजे. दुखापती हा कोणत्याही खेळाडूच्या आयुष्याचा भाग असतो. तुम्ही तिन्ही फॉरमॅट खेळत असाल आणि तुम्हाला दुखापत झाली असेल, तर परत जा, रिकव्हरी प्रक्रियेवर काम करा, पण तुम्ही तिन्ही फॉरमॅट खेळले पाहिजेत. तो म्हणाला की, तुम्ही एखाद्या विशिष्ट खेळाडूला ओळखता आणि मग त्याला वेगवेगळ्या फॉरमॅटसाठी राखून ठेवा, या कल्पनेचे मी अजिबात समर्थन करत नाही. आम्ही खेळाडूंचे तपशील, दुखापती, वर्कलोड मॅनेजमेंट आणि इतर सर्व काही व्यवस्थापित करणार आहोत.

या विधानाद्वारे, गौतमने हार्दिक पांड्यासह इतर खेळाडूंना स्पष्ट संदेश दिला आहे की, यापुढे जुने धोरण चालणार नाही. आता तुम्हाला हवे तेव्हा तुमच्या मनाप्रमाणे फॉरमॅट खेळता येईल, असे चालणार नाही. एकप्रकारे गौतमने पांड्याला स्पष्ट संदेश दिला आहे की, जर तंदुरुस्त असाल तर तुला तिन्ही फॉरमॅटमध्ये संघासाठी सर्वोत्तम योगदान द्यावे लागेल.

## विम्बल्डन २०२४ अंतिम टप्प्यात

# अल्काराझ, जोकोविच आमनेसामने



### पुन्हा अल्का'राज'?

स्पेनचा २१ वर्षीय युवा टेनिसपटू कार्लोस अल्काराजने विम्बल्डन २०२४ स्पर्धेच्या पुरुष एकेरी गटात अंतिम फेरीत स्थान मिळवले आहे. शुक्रवारी (दि.१२) पाचव्या मानांकीत डॅनिल मेदवेदेवला त्याने पराभूत करत सलग दुसऱ्यांदा विम्बल्डनची अंतिम फेरी गाठली आहे. गेल्यावर्षी अल्काराजने विम्बल्डन विजेतेपदाला गवसणी घालत मोठा पराक्रम गाजवला होता. शुक्रवारी सेंटर कोर्टवर २ तास ५५ मिनिटे चाललेल्या उपांत्य सामन्यात अल्काराजने मेदवेदेवला ६-७(१), ६-३, ६-४, ६-४ अशा चार सेटमध्ये पराभवाचा धक्का दिला. गेल्या २५ वर्षात बिग फोर व्यतिरिक्त म्हणजेच रॉजर फेडरर, राफेल नदाल, अँडी मरे आणि नोवाक जोकोविच व्यतिरिक्त एकाच वर्षात फ्रेंच ओपन आणि विम्बल्डन या दोन्ही स्पर्धांच्या एकेरीच्या अंतिम सामन्यात पोहचणारा अल्काराज पहिलाच पुरुष खेळाडू आहे.

**। विम्बल्डन । वृत्तसंस्था ।**

विम्बल्डन २०२४ (टेनिस टूर्नामेंट) च्या अंतिम फेरीतील स्पर्धकांचा निर्णय झाला आहे. पुरुष एकेरीत गतविजेता कार्लोस अल्कारेझचा सामना सात वेळच्या चॅम्पियन नोव्हाक जोकोविचशी होणार आहे. या ग्रँडस्लॅम विजेतेपदाच्या लढतीत दोघेही सलग दुसऱ्यांदा आमनेसामने येणार आहेत. आता पुरुष एकेरीच्या अंतिम सामन्यात गतविजेता कार्लोस अल्काराझ आणि सर्बियाचा नोव्हाक जोकोविच भिडणार आहेत. या दोघांमध्ये १४ जुलै रोजी विजेतेपदाचा सामना रंगणार आहे.



### जोकोविच दहाव्यांदा अंतिम फेरीत

विम्बल्डन २०२४च्या उपांत्य फेरीच्या सामन्यात इटालियन लॉरेन्झ मुसेट्टीचा पराभव करून अंतिम फेरीत आपले स्थान निश्चित केले आहे. यामध्ये पहिला सेट ६-४ असा संपला, दुसरा सेट ७-६ (७/२) असा संपला, तर जोकोविचने तिसरा सेट ६-४ ने जिंकून अंतिम फेरीत आपले स्थान निश्चित केले. या सामन्यात जोकोविचला अनेक आव्हानांना सामोरे जावे लागले असले तरी शेवटी तो विजय मिळवण्यात यशस्वी ठरला आणि टेनिस कारकिर्दीत तो दहाव्यांदा विम्बल्डनचा अंतिम सामना खेळणार आहे. जोकोविचने आतापर्यंत ७ वेळा विम्बल्डनचे विजेतेपद पटकावले असून, या वेळीही तो जिंकला तर तो महान टेनिसपटू रॉजर फेडररच्या सर्वाधिक विम्बल्डन विजेतेपदांच्या विक्रमाशी बरोबरी करेल.

## अमृता भगतचे सुवर्ण यश

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातील सुकन्या आणि रायगड जिल्हा पॉवर लिफ्टिंग असोसिएशनची खेळाडू अमृता भगत हि सध्या सुरु असलेल्या आशियाई पॅसिफिक आफ्रिकन पॉवर लिफ्टिंग चॅम्पियनशिपमध्ये सहभागी झाली आहे. भारताचे नेतृत्व करणारी अमृता हिने शनिवारी (दि.१३) झालेल्या बेंचप्रेस प्रकारात ४७ किलो वजनी गटात भारतासाठी सुवर्ण पदक जिंकले आहे. हि तिची दुसरी आंतरराष्ट्रीय स्पर्धा असून दोन्ही स्पर्धेत पदके मिळविणारी पॉवर लिफ्टर असून भारताची 'स्ट्राँग वूमन' म्हणून ती प्रसिद्धीला येत आहे.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)